## महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

## सोमवार, दिनांक ०३ जुलै, २०२३ / आषाढ १२, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**७४.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग - २ व्दवारे दिनांक सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दवारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. आता एकूण १४५ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३३ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ०३ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

लक्षवेधी सूचना क्र.११५०

## सन २०२३ अर्थसंकल्पीय अधिवेशन

**डॉ. नितिन राऊत, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय जगताप, श्री. धिरज देशमुख, श्री. बळवंत वानखडे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. माधवराव पवार, श्री. राजेश एकडे, श्री. अमीन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार या विधानसभा सदस्यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यात अनुसूचित जातींच्या विकासासाठी निश्चित धोरण नसल्यामुळे त्यांच्यासाठी असलेल्या योजनांना लोकसंख्येनुसार निधीची तरतूद नसणे, वेळेवर पूर्ण निधी मिळत नसल्याने अखर्चित रहाणे, मागील 8 वर्षात अनुसूचित जातीच्या विकासासाठी ३० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली असूनही त्याप्रमाणात विकास न होणे, Scsp/tsp अंमलबजावणी करिता कायदा करण्याची अनेक वर्षापासून मागणी असतानाही सन २०१७ पासून सदरचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाकडे प्रलंबित असणे, अनुसूचित जातीच्या विविध योजनांकडे राज्य शासनाने दुर्लक्ष केल्याने विद्यार्थांची शिष्यवृत्ती, फि माफी या योजनांमध्ये अनेक समस्या असणे, सन २०११ पासून ही शिष्यवृत्ती सुरु झाली असले तरी विदयार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे वेळेवर जमा न होणे, स्वाधार योजना, स्वाभिमान योजना, रमाई घरकुल योजना, सेवेमधील आरक्षित रिक्त पदभर्ती, अनुशेष भरती, पदौन्नतीमध्ये आरक्षण इत्यादी प्रश्न प्रलंबित असणे, या प्रश्नांकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी अनुसूचित जातीतील नागरिकांमध्ये पसरलेली नाराजीची व तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करुन अनुसूचित जातींच्या विकासासाठी निश्चित धोरण तयार करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मुख्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे निवेदन :-

नियोजन विभागाकडुन आर्थिक वर्षासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला मंजूर झालेला नियतव्यय अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील वैयक्तीक लाभाच्या विविध योजनांसाठी तसेच इतर विभागांच्या वैयक्तीक लाभार्थ्यांच्या योजनेला अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांसाठी अनुसूचित जाती घटक उपयोजनेसाठी उपलब्ध करून देण्यात येतो. विभागाला प्राप्त झालेला निधी विहित मान्यतेने खर्च करण्यात येतो. सन २०२०-२१, २०२१-२२ व सन २०२२-२३ (दि.१४ मार्च, २०२३ अखेर) मध्ये विभागास वितरीत केलेल्या निधीपैकी अनुक्रमे ९८.६५टक्के, ९०.६१टक्के व ६६.८३टक्के इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

आंध्रप्रदेश, कर्नाटक व ओरिसा या राज्याने सन 2013 पासून अनुसूचित उपयोजना व आदिवासी उपयोजनेचा कायदा केलेला आहे. सदरहू कायद्यांचा अभ्यास करुन महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजना कायदा करण्यासाठीच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्याकरिता शालेय शिक्षण घेण्याकरिता प्रि-मॅट्रीक शिष्यवृत्ती व मॅट्रीकोत्तर उच्च शिक्षण घेता येण्याकरिता राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. यामध्ये भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, मॅट्रीकोत्तर शिक्षण फि परीक्षा प्रतीपुर्ती , राजर्षि शाहु महाराज व व्यवसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना या योजनेची रक्कम पी.एफ.एम.एस प्रणालीव्दारे आधार संलग्न बॅंक खात्यात वितरीत करण्यात येते. त्याच बरोबर नमूद करण्यात येते की, विभागामार्फत राबविण्यात येणा-या इतर सर्व प्रि मॅट्रीक, पोस्ट मॅट्रीक योजनेव्दारे देण्यात येणारा लाभ /शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या /लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बॅंक खात्यात वितरीत करण्यात येतो.

रमाई आवास योजना, दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजना यासाठी मागणीनुसार निधीची तरतूद करण्यात येवून जास्तीत जास्त खर्च करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

विविध प्रशासकीय विभागांकडून प्राप्त माहितीनुसार दि.३०.०८.२०२० अखेर गट अ ते गट ड मध्ये अनुसूचित जातीची सरळसेवा व पदोन्नतीमध्ये १७९५६८ मंजूर पदे एकूण १,३९,१३८ पदे भरली आहेत. तसेच एकूण ४०,४३० इतकी रिक्त पदे आहेत. शासनाने रिक्त पदे भरण्याची मोहीम हाती घेतली असून अनुसूचीत जातीसह सर्वच प्रवर्गातील पदे भरण्यात येतील. अनुशेष भरती मोहिमेअंतर्गत रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभागांकडून माहित संकलित करण्यात येत आहे. माहित संकलित झाल्यानंतर अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष भरती मोहिम राबविण्याबाबत विचार करण्यात येईल. दि.२८ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षणासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री गटाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर मंत्रीगटाने दि.१६.१२.२०२० च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, "माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्रमांक २७९७/२०१५ वरील दिनांक ४ ऑगस्ट २०१७ च्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने माननीय सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून यापुढे पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दिनांक २५.५.२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्याचा तसेच, दि.२५.५.२००४ अथवा त्यानंतरची सेवा ज्येष्ठता विचारात घेऊन खुल्या प्रवर्गातील सेवाकनिष्ठ कर्मचारी पदोन्नत होत असल्यास सेवाज्येष्ठ मागासवर्गीय कर्मचाऱ्याला पदोन्नती देण्याचा निर्णय दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

****

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" कोल्हापूर शहरास ऐतिहासिक वारसा लाभलेला असून, करवीर निवासिनी श्री अंबाबाईचे प्रमुख स्थान असणे, तसेच कोल्हापूर शहर हे भारतातील प्रमुख पर्यटन स्थळांपैकी एक धार्मिक स्थळ म्हणून ओळख असणे, कोल्हापुरात श्री महालक्ष्मीच्या दर्शनासाठी देशातूनच नव्हे तर जगातून भाविक भक्त, महिला, लाखोंच्या संख्येने दररोज येत असल्याचे दिसून येत असणे, तसेच श्री आंबाबाईच्या दर्शनाला तसेच पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या महिलाना संपूर्ण शहरामध्ये कोठेही स्वतंत्र महिला स्वच्छतागृह नसल्याने महिला पर्यटकांची अत्यंत गैरसोय होत असणे, तसेच कोल्हापूर शहराची लोकसंख्या सुमारे ७ लाखाच्या आसपास असतानाही सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने स्थानिक महिला यांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत असून परिणामी महिलांकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याने युरिन अधिक वेळ तटल्यामुळे महिलाना युरिन इन्फेक्शन, फंगल इन्फेक्शन तसेच किडणीचे गंभीर आजार होऊ शकतात व किडनी स्टोन सारखा त्रासही होऊ शकतो अशी धक्कादायक माहिती किंवा चिंता आरोग्य तज्ञांकडून करण्यात आलेली असणे, तसेच कोल्हापूर शहरामध्ये महिलांकरीत स्वतंत्र स्वच्छतागृह तातडीने उभरण्याबाबत केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने भरगोस निधी देऊन स्थानिक प्रशासन यांना देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अनेकदा केलेली असणे, परंतु प्रशासनाने महिलांच्याप्रश्नी केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

कोल्हापूर शहरास ऐतिहासिक वारसा लाभलेला असून साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले श्रीक्षेत्र महालक्ष्मी(करवीर निवासिनी, अंबाबाई) मंदिर येथे असल्यामुळे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात, ही वस्तूस्थिती आहे.

शहरामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह बांधण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये निधीची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार शहरातील गर्दीची ठिकाणे, बाजारपेठ, भाजी मंडई, बस थांबे इ. ठिकाणी प्रत्येकी २ सिटसच्या वॉश बेसिनसह स्वच्छतागृहे प्रस्तावित करण्यात आली होती. सदर कामांपैकी (१) यल्लमा मंदिर ओढयावर, (२)शाहू खासबाग मैदान के.एम.टी.बस स्टॅन्डसमोर, (३)ए/वॉर्ड खराडे कॉलेज कम्पाऊंड रंकाळा रोड, (४)जयप्रकाश नारायण उदयानामध्ये, (५)रंकाळा चौपाटी, (६)रंकाळा पदपथ अशा ६ ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याची कामे पुर्णत्वास आलेली असून सदर स्वच्छतागृहांचा वापर सुरु आहे. तसेच सध्या (१) टाऊन हॉल बसस्टॉप, (२) बिंदु चौक पार्किंग, (३) मेरी वेदर ग्राऊंड, (४)राजकपूर पुतळा बाग, (५)जनता बाजार चौक येथे महिलांसाठी प्रत्येकी २ युनिटची स्वच्छतागृहे उभारण्याचे काम पुर्णत्वास आलेले असून सदर स्वच्छतागृहांचा वापर सुरु आहे.

सन २०२१-२२ मध्ये (१)केशवराव भोसले नाटयगृह, (२)गांधी मैदान विभागीय कार्यालय, (३) के.एम.सी.कॉलेज, (४)मध्यवर्ती बसस्थानक, (५)ताराबाई उदयान या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृहाची कामे प्रस्तावित आहेत.

त्याचप्रमाणे नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत सन २०२२-२३ या वर्षामध्ये शहरातील (१)रंकाळा तलाव नवरंग प्रेस नजिक, (२)पंचगंगा घाटालगत सि.स.नं.२३२४या मिळकतीमध्ये, (३) रंकाळा चौपाटी डिमार्टसमोर, (४) कपिलतिर्थ मार्केट, (५) टेंबलाई मंदिर मागील ऑक्सिजन पार्क, (६)टाकाळा बॅडमिंटन हॉल या ठिकाणी स्वच्छतागृहे बांधण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

*****

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २१२५**

**श्री. कुमार आयलानी, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २६७ अ नुसार दिनांक ४ जानेवारी, २००८ नंतरच्या उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अवैध बांधकामांना देय मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी अवैध बांधकाम शास्ती कर राज्यशासनाकडून लावण्यात येणे. उल्हासनगर शहरांचे स्थानिक लोकप्रतिनिधीकडून अवैध बांधकामावरील शास्ती कर संपूर्ण माफ करणेबाबत महानगरपालिका सभागृहात विशेष महासभा ठराव क्र. ७१ दि.२९.०३.२०२२ रोजी ठराव घेतला असणे. प्रशासनाने तो ठराव अंमलात न आणणे.अथवा विखंडित न करणे. सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ नुसार "महानगरपालिकेकडून ठरविण्यात येईल अशा दराने शास्ती भरण्यास पात्र असेल" अशी तरतूद असणे. मनपाने ठराव व तरतूद असताना कार्यवाही न करणे. यामुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंड बसणे. मनपाचे कर वसुली न होणे. अवैध बांधकामाला मनपा ठरावात नमूद प्रमाणे शास्ती माफ करण्यात यावी अशी सर्वसामान्य शहरवासियांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने संपूर्णत अवैध बांधकामवर शास्ती माफ करण्याची आवश्यकता व महानगरपालिकेस निदेश देणे."

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २ शासन राजपत्रात दिनांक ०४.०१.२००८ रोजी प्रसिध्द झाला. सदर अधिनियमान्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये २६७ अ हे नवीन कलम समाविष्ट करुन त्यानुसार कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील, तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटीइतकी शास्ती भरण्यास पात्र असेल, अशी तरतूद करण्यात आली होती. सदर तरतुदीच्या अनुषंगाने सन २०१४-१५ पासून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अवैध बांधकामांवर मालमत्ता कराच्या दुप्पटीइतकी शास्ती आकारण्यात आली.

तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (अध्यादेश क्र. ३), दिनांक ०८.०१.२०१७ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली. सदर अध्यादेशान्वये करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने सर्व महानगरपालिकांमध्ये एकवाक्यता असावी व अल्प उत्पन्न घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनधिकृत निवासी बांधकामांवर प्रभावी आळा बसविण्याकरिता दिनांक ११.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार शास्तीची आकारणी करण्याबाबत

राज्यातील सर्व महानगरपालिकांना निर्देश देण्यात आले. सदर अध्यादेश व शासन निर्णयानुसार महासभा ठराव, क्रमांक २५, दिनांक १५.०९.२०१८ अन्वये अनधिकृत शास्ती भरतांना ६०० ते १००० फुट चौरस फुटाकरिता ५० टक्के आणि १००० चौरस फुटावरील जास्त जागेवरील अवैध निवासी बांधकामाकरिता दुप्पट दंड घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अवैध निवासी बांधकामांवर दिनांक ११.०१.२०१७ शासन निर्णयात नमूद शास्तीचे दर दिनांक ०४.०१.२०१८ पासून लागू करण्यात आले आहेत.

तद्नंनतर उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्रमांक ३६, दिनांक १९.११.२०१९ नुसार ६०० फुटापर्यंत ०, ६०० ते १००० फुटापर्यंत ५० टक्के सध्याप्रमाणे रहिवाशी क्षेत्रात शास्ती लावण्यास आणि सन २०१७ पर्यंत रहिवांशाकडून / टॅक्स धारकांकडून जे दंड वसूल केले आहेत ते त्यांना नंतरच्या बिलामध्ये एकवेळा लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

अनधिकृत बांधकाम शास्तीबाबत कायदेशीरदृष्ट्या धोरणात्मक निर्णय घेणेकामी प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महासभा ठराव क्रमांक ७१, दिनांक २९.०३.२०२२ पारीत झाला असून, सदर ठरावानुसार ६०० चौ. फुटापर्यंच्या अनधिकृत निवासी बांधकामाकरिता ०, ६०१ ते १००० चौ. फुटापर्यंतच्या निवासी बांधकामाकरिता प्रतिवर्षी मालमत्ता करातील फक्त सर्वसाधारण कराच्या २५% टक्के दराने व १००१ चौ. फुटावरील अनधिकृत निवासी बांधकामाकरिता प्रतिवर्षी मालमत्ता करातील फक्त सर्वसाधारण कराच्या ५०% टक्के दराने शास्ती आकारण्यात यावी तसेच, ६०० चौ. फुटापर्यंच्या अनधिकृत अनिवासी बांधकामाकरिता ०, ६०१ ते १००० चौ. फुटापर्यंतच्या अनिवासी बांधकामाकरिता प्रतिवर्षी मालमत्ता करातील फक्त सर्वसाधारण कराच्या २५% टक्के दराने व १००१ चौ. फुटावरील अनधिकृत अनिवासी बांधकामाकरिता प्रतिवर्षी मालमत्ता करातील फक्त सर्वसाधारण कराच्या ५०% टक्के दराने शास्ती आकारण्यात यावी, तसेच सदरचे दर यापूर्वी शास्ती लागू केलेल्या अनधिकृत मालमत्ता व नव्याने अस्तित्वात आलेल्या अनधिकृत मालमत्तांवर दिनांक ०१.०४.२०२२ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि महासभा ठराव क्रमांक ७१, दिनांक २९.०३.२०२२ ची अंमलबजावणी अद्यापि करण्यात आलेली नाही.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २२४७**

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्रीमती गीता जैन, श्रीमती लताबाई सोनवणे, श्रीमती मंजुळा गावीत, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई महानगर पालिकेत सन २००९ मध्ये रोजंदारीवर भरती केलेल्या कामगरांना कोव्हिड या साथीच्या आजाराचा आधार घेऊन म.न.पा. च्या सेवेत अतिविशेष खास बाब म्हणून सामावून घेण्यासाठी जुन २०२१ रोजी मुंबई महापालिकेच्या सर्वसाधारण बैठकीत निर्णय घेतला जाणे, जानेवारी २०२२ मध्ये सर्वसाधारण बैठकित दिलेली मान्यता, मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक घेऊन सदर कर्मचाऱ्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा घेतलेला निर्णय,एक वर्षाचा कालावधी होऊनही मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षेतेखाली न झालेली बैठक, कोरोना रोगाच्या साथीत सदर कर्मचाऱ्यांनी मुंबई महापालिकेत केलेली सेवा मागील दहा ते बारा वर्षापासून सदर कर्मचारी महापालिकेच्या सेवेत घेण्याबाब्त मा.मुख्यमंत्री,नगरविकास सचिव,महापालिका आयुक्त,महापौर व इतर अधिकाऱ्यांकडे वारंवार केलेल्या तक्रारी, शासनाने सदर कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सेवेत घेण्याबाबत मुंबई पालिकेला आदेश देण्याची आवश्यक्ता शासनाने हयाबाबत केलेली व करावयाची कार्यवाही,शासनाची भुमिका व प्रतिक्रिया"

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेत रोजंदारी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांच्या बाबतीत माहे जून, २०२१ व माहे जानेवारी, २०२२ च्या महापालिकेच्या सर्वसाधारण बैठकीत कोणताही निर्णय झालेला नाही. तसेच रोजंदारी कामगारांसदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ५३१७/२०२१ न्यायप्रविष्ट आहे.

आया / हमाल / कामगार /कक्ष परिचर इत्यादी पदांच्या सन २००९ मधील सरळसेवा भरतीच्या जाहिरातीनुसार निवड झालेल्या उमेदवारांव्यतिरिक्त उर्वरित उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत खालील कारणास्तव सामावून घेता येत नाही:-

- दिनांक २०.०६.२००१ रोजीच्या शासन निर्णयानुसार, "बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध संवर्गातील पदांवर सरळसेवा भरतीने पदे भरण्याकरिता तयार करण्यात आलेल्या निवड / प्रतिक्षा यादीची विधीग्राह्यता एक वर्ष इतकी असते.
- सन २००९ नंतर सरळसेवा भरतीमधील आरक्षण, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ. मध्ये बदल झालेला आहे.
- सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयात पाच याचिका दाखल करण्यात आल्या असून, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी, "सन २००९ मधील जाहिरातीनुसार चतुर्थ श्रेणी कामगारांची गुणवत्ता तसेच प्रतिक्षा यादी पुनरुज्जीवित केली जाऊ शकत नाही," असे आदेश दिले आहेत. त्यामुळे महापालिका पातळीवर सदर प्रकरण बंद करण्यात आले आहे.
- सन २००९ मधील उर्वरित उमेदवारांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्रमांक ५९२/२०१९ व २८४/२०१९ मा. न्यायालयाने दिनांक ०३.०२.२०२३ रोजीच्या निर्णयाद्वारे फेटाळल्या आहेत.

*******

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक - ११७</u>

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अलवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. बंटी भांगडिया, श्री.संजय केळकर, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर, श्री. संतोष दानवे, श्रीमती श्वेता महाले, वि. स. सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११७ पुढीलप्रमाणे आहे.-**

"रस्ते अपघात कमी करण्यासाठी चालकांना वाहतुकीच्या नियमांची शिस्त लावण्यासाठी आणि बेशिस्त चालकांना लगाम घालण्यासाठी राज्यातील वाहतूक पोसिलांना अतिरिक्त १९४ इंटरसेप्टर वाहनांची आवश्यकत असणे, याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे कोरोना काळापासून रखडलेला असणे, त्यामुळे वाहतूक पोलिसांना उपलब्ध असलेल्या इंटरसेप्टर वाहनांद्वारेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणा-या विरोधात कारवाई करावी लागत असणे, या वाहनांमध्ये स्पीड गन ठेवण्याची सुविधा असणे, त्यामुळे उन- वारा, पावसाचा परिणाम पोलिसांच्या स्पीडगन कारवाईवर होत नसणे, शिवाय कारवाईसाठी सीसी टीव्ही कॅमेरे, ब्रीद ॲनलायझर, ई-चलान यंत्रणाही असणे, त्यामुळे तात्काळ या प्रस्तावाला मंजुरी देऊन वाहतूक पोलिसांनी १९४ इंटरसेप्टर वाहने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

<u>मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन</u>

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ता सुरक्षा समितीने दिलेल्या निर्देशानुसार रस्ता सुरक्षा संदर्भात प्रस्तावांना मान्यता देण्याकरीता मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली "रस्ता सुरक्षा निधी नियंत्रण समिती" स्थापित करण्यात आली आहे. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मान्यता दिलेल्या खर्चाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने परिवहन विभागाव्दारे दि.०२ मार्च, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना १९४ इंटरसेप्टर वाहने खरेदी करण्यास रु.२०.०० कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन पोलीस महासंचालक कार्यालयाव्दारे १९४ इंटरसेप्टर वाहने खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असून, त्याअनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाच्या अधिनस्त घटकातील वाहतूक विभागाकरिता रस्ता सुरक्षा निधीतून १९४ नग इंटरसेप्टर वाहने एकलस्त्रोताद्वारे (Proprietary Article) पध्दतीने खरेदी करण्यास दि.०३.०३.२०२३ रोजी मान्यता देण्यात आली आहे.

*****

रोटा/३५४[ ७७-६-२०२३]·

लक्षवेधी सूचना क्र. ४२६

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. सुनिल प्रभु, वि. स. स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ४२६ पुढीलप्रमाणे आहे-

"नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील पोलीसांनी आदिवासी कातकरी समाजातील अल्पवयीन मुलामुलींची विक्री करुन मेंढीपालनाच्या वेठबिगारी प्रकरणात दाखल झालेल्या गुन्ह्याचा तपास करुन व त्यातील दोषींना अटक करणेबाबत सहा महिने होऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचा गंभीर प्रकार दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, सदर वेठबिगार प्रकरणात राष्ट्रीय अनुसुचीत जनजाती आयोगाने नाशिक व अहमदनगरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक या चारजणांना समन्स बजावूनही हे गैरहजर राहणे, इगतपुरी तालुक्यातील उभाडे गावात आदिवासी कातकरी समाजातील कुटुंबाला पैसे व मेंढीपालनाचे आमिष दाखवून त्यांच्या मुलाची विक्री झाल्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस येणे, त्यापैकी एका मुलीचा खून झाल्यानंतर सदरहू प्रकरण अधिकच प्रकाशझोतात येणे, सदरहू प्रकरणी काही पिडीत मुला-मुलींनी दिलेल्या जबाबानुसार संगमनेर पोलीसांनी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात येणे, त्यातील एक गुन्हा पारनेर पोलीसात वर्ग करण्यात येणे, त्याअन्वये नाशिक व अहमदनगर पोलीसांनी सदर प्रकरणाचा तपास करुन संशयीतांना अटक करुन तपास सुरु ठेवणे, सदर प्रकरणी राष्ट्रीय अनुसुचीत जनजाती आयोगाने नाशिक व अहमदनगरचे जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांना समन्स बजावूनही उपस्थित न राहिल्याने आयोगाने अटक वॉरंट जारी करण्यात येऊनही त्याची दखल न घेता त्यांनी गैरहजर राहून दुर्लक्ष केल्याचा घडलेला प्रकार, यामुळे आदिवासी मुलामुलींची विक्री करुन वेठबिगार प्रकरणाचा तपास करुन अद्याप यातील दोषी व्यक्तींना अटक करुन अहवाल सादर करणेबाबत नाशिक व अहमदनगर पोलीसांना आलेले अपयश, यामुळे पिडीत आदिवासी जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

मौजे उभाडे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील अल्पवयीन मुलीस अहमदनगर येथील एक व्यक्ती मेंढ्या चारण्याकरिता घेऊन गेला होता. सदर मुलीची प्रकृती बिघडल्याच्या कारणास्तव संबंधित व्यक्तीने सदर मुलीस मौजे उभाडे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे आणून सोडले.

सदर मुलीच्या गळ्यावर व हाताच्या कोपराला जखमा आढळून आल्याने सदर प्रकरणी दिनांक २८.०८.२०२२ रोजी घोटी पोलीस स्टेशन, जि. नाशिक येथे गु. र. क्र. ११५/२०२२, भा. दं. वि. कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मुलीच्या आई-वडीलांनी तिला उपचाराकरिता प्रथमत: ग्रामीण रुग्णालय, घोटी व नंतर सामान्य रुग्णालय, नाशिक येथे दाखल केले. उपचारादरम्यान दिनांक २८.०८.२०२२ रोजी सदर मुलीचा मृत्यू झाला.

सदर गुन्हा हा घारगाव पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे वर्ग करण्यात आला असून घारगाव पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु. र. क्र. २७९/२०२२ भा. दं. वि. कलम ३०७, ३०२, ३७४ सह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ च्या कलम ३ (२) (५), सह वेठबिगार पध्दत (निर्मुलन) अधिनियम कलम १६,१७,१८ आणि बालकामगार प्रतिबंध अधिनियम कलम ३, १४ अन्वये दिनांक ०३.०९.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींविरुध्द दिनांक २०.१२.२०२२ रोजी मा. न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे.

मेंढीपालन व शेतीच्या कामाकरिता वेठबिगारी व बाल मजूरी याबाबत प्राप्त तक्रारीवरून संगमनेर तालुका पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गु. र. क्र. ३७८/२०२२, गु. र. क्र. ५०/२०२३, घारगाव पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु. र. क्र. ४०/२०२३ आणि पारनेर पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु. र. क्र. ७२७/२०२२, गु. र. क्र. ६५/२०२३ अन्वये भारतीय दंडविधान संहिता, सह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९, सह वेठबिगार पध्दत (निर्मुलन) अधिनियम आणि बालकामगार प्रतिबंध अधिनियमातील विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संगमनेर तालुका पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गु. र. क्र. ३७८/२०२२, पारनेर पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु. र. क्र. ७२७/२०२२ या दोन्ही गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली आहे. घारगाव पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु. र. क्र. ४०/२०२३ आणि संगमनेर तालुका पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गु. र. क्र. ५०/२०२३ अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपींनी अटकपुर्व जामीनाकरिता मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. पारनेर पोलीस स्टेशन येथे दाखल गु. र. क्र. ६५/२०२३ मधील ०४ आरोपींचा शोध सुरु आहे.

वय वर्षे ६ ते १५ या वयोगटातील मुलांच्या विक्रीबाबत मराठी दैनिकामध्ये प्रसिध्द बातमीच्या आधारे मा. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक ०२.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधिक्षक, अहमदनगर आणि नाशिक व जिल्हाधिकारी, अहमदनगर आणि नाशिक यांना समन्स बजावण्यात आले होते. सदर अधिकारी हे दिनांक २७.०१.२०२३ रोजी मा. अनुसूचित जमाती आयोगाकडे उपस्थित राहिले आहेत.

---

१४१

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन
## लक्षवेधी सूचना

श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील,मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.७९८** पुढीलप्रमाणे आहे :-

"ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या डोंबिवलीतील मानपाडा पोलीस ठाणे १९७८ मध्ये उभारण्यात आलेले असून,या पोलीस ठाण्याची हद्द ६८ चौरस किमी इतकी आहे,मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत डोंबिवली फेज १ व २ असे या औद्योगिक क्षेत्र,२७ गाव,लोढा पलावा,रुणवाल मायसिटी,रुणवाल गार्डन,अनंतम सारख्या मेगा सिटीसह अन्य असंख्य मोठे गृह प्रकल्प उभारण्यात आल्याने तसेच होत असलेले नागरीकरण,रासायनिक आणि इतर विविध कंपन्या,बार-रेस्टॉरंटचे पसरलेले जाळे,तसेच कामानिमित्त परराज्यातून येणारे मोठ्या प्रमाणातील लोक आदीमुळे २०१८ मध्ये सात ते आठ लाखाच्या दरम्यान असलेली लोकसंख्या सद्यस्थितीत ११ लाखाहून अधिक झालेली असून मानपाडा पोलीस स्टेशनचे पोलीस बळ मात्र आजही १५३ इतकेच असल्याने, एकीकडे अपुऱ्या पोलीस कर्मचारी वर्गामुळे अस्तित्व असलेल्या पोलिसांवर नाहक मोठ्या प्रमाणावर पडत असलेला अधिकचा कामाचा ताण, तर दुसरीकडे कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस गंभीर झालेली व होत असलेली समस्या,वरिष्ठासह एकूण ३ पोलीस निरीक्षक, ६ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १२ पोलीस उपनिरीक्षक, २ महिला उपनिरीक्षक आणि १३० पोलीस कर्मचारी असे एकूण १५३ संख्याबळ या पोलीस ठाण्यात कार्यरत असल्याने वाढणाऱ्या चोऱ्या,दरोडे,घरफोड्या,दुकानाची लुट,अल्पवयीन मुली व महिलांवर होत असलेले अत्याचारचे प्रकार वाढीस असल्याची परिस्थिती,२०१६ च्या आधीपासून मानपाडा पोलीस ठाण्याचे विभाजन व्हावे आणि दावडी व काटई अशी आणखी दोन नवीन पोलीस ठाणी उभारण्यात यावीत म्हणून कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे स्थानिक लोकप्रतिनिधी सह अन्य लोकप्रतिनिधींनी, विविध सामाजिक संघटनांनी आजमितीस सातत्याने करण्यात आलेली, त्यानुषंगाने मा. पालकमंत्री, मा.गृहमंत्री तसेच सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांसमवेत अनेक बैठकीही संपन्न होऊन त्यामध्ये विचार विनिमय होऊन सकारात्मक निर्णय घेण्यात आलेत. मात्र त्याची आजमितीस पूर्तताच न झाल्याने मानपाडा पोलीस स्टेशनच्या विभाजनाचा आजमितीस केवळ कागदवर राहिल्याने, कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे संघाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पुन्हा मा.गृहमंत्री यांच्याकडे दि.१६ जून, २०२१ रोजी सविस्तर लेखी पत्र पाठवून मानपाडा पोलीस स्टेशनचे लवकरात लवकर विभाजन करून दावडी व काटई अशी आणखीन दोन नवीन पोलीस ठाणी उभारण्याची मागणीही केलेली आहे, तरी त्याकडे शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे सन २०२१ च्या तृतीय अधिवेशनात कपात सूचना (क.पा.सू.२९६६) सभागृहात उपस्थित करून शासनाकडे पुन्हा पाठपुरवठा केलेला असतानाही शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष व टाळाटाळ,परिणामतः मानपाडा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात दिवसेंदिवस वाढीस लागलेले गुंडगिरी,समाज कंटकाकडून अल्पवयीन मुली

व महिलांच्या सुरक्षिततेची व सर्वसामान्य नागरिकांच्या मालमतेच्या सुरक्षिततेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती तसेच सप्टेंबर २०२१ मध्ये ३३ नराधमांनी आळीपाळीने एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आल्याचे प्रकारामुळे सांस्कृतिक डोंबिवलीचे प्रकरण संपूर्ण देशभर चांगलेच गाजल्याची स्थिती,सबब डोंबिवली मानपाडा पोलीस स्टेशनचे विनाविलंब विभाजन करून दावडी व काटई अशी आणखीन दोन नवीन पोलीस ठाणी निर्माण करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

मानपाडा पोलीस ठाण्याचे विभाजन करुन काटई,दावडी अशी दोन पोलीस ठाणे निर्माण करणे ऐवजी सदयस्थितीत एकच काटई हे नविन पोलीस ठाणे निर्माण करणे प्रशासकीय व तांत्रिकदृष्टया सोयीस्कर ठरणार असल्याने पोलीस आयुक्त, ठाणे यांनी दि.३१.०५.२०२२ च्या पत्राव्दारे प्राधान्याने काटई पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तथापि,नविन काटई पोलीस ठाणे निर्माण करण्याचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाचे संमतीपत्र,स्थानिक ग्रामपंचायत ठराव,अदयावत वर्षनिहाय गुन्हे प्रमाण व प्रस्तावित पोलीस ठाणेकरीता नव्याने पदनिर्मिती करीता विवरणपत्रनिहाय माहिती सादर करणेबाबत पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयाने दि.१२.०८.२०२२ च्या पत्राव्दारे पोलीस आयुक्त,ठाणे यांना कळविले आहे.

सन २०२१ मध्ये अल्पवयीन मुलीवर करण्यात आलेल्या अत्याचाराच्या विरोधात मानपाडा पोलीस ठाणेमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून,सदर गुन्हयातील ३३ आरोपींना मानपाडा पोलीस ठाणेकडून अटक करुन, त्यांचेविरोधात वेळेत मा.कोर्टामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून,सदरचे आरोपी अदयाप जेलबंदी आहेत.

मानपाडा पोलीस ठाणे अंतर्गत गुन्हेगारची प्रमाण नियंत्रणात आहे.परंतु शहरामध्ये जागा उपलब्ध असल्याने मानपाडा पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रातील मोकळया जागांवर बांधकामे सुरु आहेत. त्यामुळे सदर भागात झपाट्याने लोकसंख्या वाढत असून,मोठया प्रमाणावर शहरीकरण होत आहे. त्यामुळे मानपाडा पोलीस ठाण्याचे विभाजन करुन काटई हे नविन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत प्रस्ताव पोलीस आयुक्त,ठाणे यांचेकडून करण्यात आला असून,सदर प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त नसून,तो प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून वित्त विभागाच्या मान्यतेने याबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल.

*******

लक्षवेधी सुचना क्र. ८०१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील,मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.८०१** पुढीलप्रमाणे आहे :-

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत येणाऱ्या दिवा शहर व परिसरातील गावांची संख्या ५ लाखाहून अधिक असून दिवसेंदिवस शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढत आहे,तसेच हा संपूर्ण परिसर मुंब्रा पोलीस स्टेशनच्या हद्दीत असून मुंब्रा पोलीस मध्ये आधीच पोलीस कर्मचारी वर्गाची संख्या अपुरी असल्यामुळे एकीकडे अस्तित्वात असलेल्या पोलिसांवर प्रचंड प्रमाणावर कामाचा ताण, तर दुसरीकडे कायदा व सुव्यवस्थाचे गंभीर समस्या उद्भवत असल्याने ब करण्यात यावी म्हणून येथील नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा.गृहमंत्री,मा.पालकमंत्री,ठाणे जिल्हा,मा.मुख्यमंत्री आदीकडे सातत्याने केलेले मागणी,या अनुषंगाने पोलिस आयुक्तालय, ठाणे शहर यांनी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील मुंब्रा पोलीस ठाण्याचे विभाजन करून दिवा येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य यांना पाठविलानंतर सदरहू प्रस्ताव रितसर योग्य त्या शिफारशीन्वये राज्य शासनास पाठविल्यानंतर,सदरहू प्रस्तावास राज्य शासनाची मान्यता मिळण्यास होत असलेली अक्षम्य दिरंगाई व टाळाटाळ,परिणामतः दिवा शहर व परिसरातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढीस लागलेले विविध प्रकारची गुन्हे,महिला व तरुणींच्या सुरक्षितेची निर्माण झालेली गंभीर समस्या,यामुळे शासनाने सदरहू प्रस्तावास विनाविलंब मान्यता देऊन दिवा शहरासाठी नवीन स्वतंत्र पोलिस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पोलीस आयुक्त,ठाणे शहर यांच्या अधिपत्याखालील मुंब्रा पोलीस ठाणेचे विभाजन करुन दिवा येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त,ठाणे शहर यांचे कार्यालयाने पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सादर केल्यानंतर पोलीस ठाणे,दिवा हे महाराष्ट्र राज्य पोलीस दल पदनिर्मितीच्या दुस-या टप्पात निर्माण करण्याचे पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयाने दि.२९/९/२०१५ च्या पत्राव्दारे प्रस्तावित केले. त्यानुषंगाने दुसऱ्या टप्प्यात पदनिर्मिती व नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित करून,प्रथम पदांचा आढावा घेणेबाबत अभिप्राय दिले. त्यास अनुलक्षून पोलीस महासंचालक कार्यालयास दि.९/६/२०१६ च्या शासन पत्राव्दारे उक्त मुद्यासंदर्भात माहिती सादर करणेबाबत कळविले असता, त्यांचे प्राप्त माहितीच्या आधारे पुन्हा प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर केला असता, शासन निर्णय, वित्त विभाग, दि.२५/५/२०१७ व्दारे दिर्घकालीन वित्तीय स्थैर्यसाठी नवीन पदनिर्मिती, तसेच पदभरती करण्यास निर्बंध घालण्यात आल्याने, प्रशासकीय विभागांनी आकृतीबंध निश्चित

रोटा/एच-०३६१(७५० - ६-२३) (क्र.मा.च.)

केल्याशिवाय प्रशासकीय विभागांना पदनिर्मिती,पदभरती,तसेच पदे रुपांतरीत करण्यासही अनुमती देण्यास येणार नसल्याचे अभिप्राय दिले. त्याअनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालय यांचेसह त्यांचे अधिनस्त सर्व पोलीस घटक कार्यालयांच्या पदांचा आढावा घेऊन,महाराष्ट्र पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंध अहवाल शासनास सादर करण्याच्या सुचना पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना दि.२३/१०/२०१७ च्या शासन पत्राव्दारे देण्यात आल्या.

दरम्यानच्या कालावधीत मा.लोकप्रतिनिधींनी दिवा येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत केलेली विनंती विचारात घेऊन,सदरहू पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव आवश्यक असल्याने, तसेच दिवा पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत यापूर्वी पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात दि.१३/०१/२०२० च्या पत्राव्दारे अधिकची माहिती पोलीस महासंचालक कार्यालयाकडून मागविण्यात आली होती. तसेच, पोलीस महासंचालक कार्यालयानेही दि.१९/०९/२०२२ च्या पत्राव्दारे उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अद्यावत गुन्हे निहाय माहिती,जिल्हाधिकारी कार्यालयाचे संमतीपत्रक व स्थानिक प्रशासन मंजूरी व दिवा पोलीस ठाणेचे इमारत बांधकाम इ. बाबत माहिती सादर करणेबाबत पोलीस आयुक्त,ठाणे शहर यांना सविस्तर सुधारित अहवाल सादर करणेबाबत निर्देशित करण्यात आले.परंतु ठाणे महानगरपालिका यांचेमार्फत मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये पोलीस खात्याकरीता आरक्षित केलेला भूखंड मौजे दातिवली सर्व्हे नं १२१ पे १२३ पे येथे ३८ चौ.हेक्टर जागेचा भूखंड आरक्षित करण्यात आलेला आहे. परंतु सदर जागेवर त्यापूर्वीच स्थानिक रहीवाशी यांनी अतिक्रमणे करुन पक्की निवासी बांधकामे केलेली असल्याने,नियोजित दिवा पोलीस ठाणेच्या बांधकामाकरीता सदर जागेवरील अतिक्रमण निष्कासित करुन पोलीस खात्यांचे नावे होण्याकरीता किंवा सदर भूखंडा ऐवजी स्वतंत्र मोकळा भूखंड व संमतीपत्रक उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी,ठाणे तसेच आयुक्त,ठाणे महानगरपालिका यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आल्याचे,तसेच सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याची तजविज ठेवली असल्याचे पोलीस आयुक्त,ठाणे शहर यांनी कळविले आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाने सन २०२२ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाचा पदांचा आढावा व सुधारित आकृतीबंध अहवाल शासनास सादर केला. त्यामध्ये पोलीस महासंचालक कार्यालय यांचेसह एकूण ७० पोलीस घटकांचा समावेश असून, त्या सर्वच्या सर्व पोलीस घटक कार्यालयाच्या आकृतीबंधाच्या प्रस्तावास टप्प्या-टप्प्याने वित्त विभाग,उपसमिती व मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीने अनुक्रमे दि.१३/१२/२०२२ व दि.६/३/२०२३ व्दारे आयोजित बैठकीत मान्यता दिली असून, अंतिम शासन निर्णय वित्त विभाग व शासनाच्या मान्यतेने निर्गमित करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

उक्त पार्श्वभूमीवर पोलीस ठाणे,दिवा बाबत सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून वित्त विभागाच्या मान्यतेने याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

*****

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.छगन भुजबळ, श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री.रोहित पवार, श्री.दत्तात्रय भरणे, श्री.शेखर निकम, श्री.संजय बनसोडे, श्री.प्रकाश आबिटकर, श्रीम. प्रतिभा धानोरकर, श्रीम. जयश्री जाधव, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.सुनिल केदार, श्री.अस्लम शेख, कुमारी प्रणिती शिंदे, श्री.अबू आजमी विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) लागू केलेली असल्याने लाखो कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असणे, या पेन्शन योजनेमुळे कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे जीवन पूर्णतः अंध:कारमय झालेले असणे, सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना आर्थिक / सामाजिक स्तरावर त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, त्यामुळे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची शासनपातळीवर वारंवार मागणी केलेली असणे, मात्र त्यावर निर्णय घेतला जात नसल्याने आवश्यक सोयीसुविधाअभावी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे दैनंदिन जीवन खडतर झालेले असणे, आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविरोधात सरकारी कर्मचाऱ्यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी पासून राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चा काढून आंदोलने सुरु करणे, राजपत्रित अधिकारी महासंघानेही आंदोलनाचा इशारा दिलेला असून सरकारी / निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी पासून बेमुदत राज्यव्यापी संपाची घोषणा केलेली असणे, राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना बंद करुन जुनी पेन्शन योजना लागू करावी, कार्यरत पदांचा सुधारित आकृतिबंध त्वरित रद्द करावा या प्रमुख मागण्यांसही इतर मागण्यांवर न्याय्य निर्णय घेण्याची कर्मचारी संघटनांनी केलेली मागणी, सदर प्रकरणी आवश्यक निर्णय घेण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी, राज्य शासकीय कर्मचारी महासंघाने मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील लक्षावधी शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ पासून सुरु होणाऱ्या अर्थसंकल्पिय अधिवेशन काळात तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेमुळे त्यांचेवर अन्याय होत असल्याने जुनी पेन्शन योजना लागू करण्याची त्यांनी न्याय्य मागणी केलेली असणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होणे, शासनाने तातडीने निर्णय घेऊन त्वरेने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा.उप मुख्यमंत्री यांचे निवेदन

निवृत्तिवेतनविषयक दायित्वाचा राज्य शासनाच्या तिजोरीवर सातत्याने पडणारा आर्थिक भार वाढत असून जुनी निवृत्तिवेतन योजना खर्चिक ठरत असल्यामुळे राज्य शासनाच्या सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर

नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. वित्त विभागाच्या दिनांक ३१.१०.२००५ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू केली आहे. परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना /राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम,१९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे लाभ अनुज्ञेय ठरत नाहीत.

२. केंद्र शासनाच्या धर्तीवर वित्त विभागाच्या दिनांक १९.०८.२०१९ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत शासन अंशदान १० % वरुन १४% केलेले आहे.

३. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ३०.०९.२०२२ अन्वये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना स्तर-१ मध्ये जमा असलेल्या अंशदानाची रक्कम गुंतवणूकीचा विकल्प निवडण्याची मुभा दिली आहे.

४. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत (NPS) निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तिनंतर ६०% रक्कम रोखीने प्राप्त होणार आहे. उर्वरित ४०% रक्कम वार्षिकी मध्ये (Annuity) मध्ये गुंतविलेल्या रकमेवर कर्मचाऱ्यास निवृत्तिवेतन तसेच सेवानिवृत्तिच्यावेळी त्याच्यावर अवलंबून असलेले आई-वडील तसेच त्याची/तिचा यथास्थिती पत्नी/पती यांना हयातभर कुटुंबनिवृत्तिवेतन मिळत राहणार आहे.

तथापि, वित्त विभाग, शासन निर्णय दि.१४.३.२०२३ अन्वये दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तिअंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.

५. प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याकरिता पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याच्या सूचना वित्त विभागाने दि.११.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या आहेत. त्यानुसार सर्व प्रशासकीय विभागांनी पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध निश्चित करणे आवश्यक आहे.

६. वित्त विभाग, शासन निर्णय दि.३१.०३.२०२३ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदानाचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे.

---------------

लक्षवेधी सूचना क्र.१८००

## सन २०२३ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. मंगेश कुडाळकर, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८०० पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या ५६ वसाहतींस वाढीव सेवाशुल्कापोटी आलेली बिले, त्यात म्हाडाने सन २०१७ पासून सेवाशुल्कात केलेली वाढ, काही संस्थाना सन १९९८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सेवाशुल्काचा भरणा करण्याबाबत पाठवलेली बिले, एकेका संस्थेस लाखाची आलेली बिले, संस्थानी १९९८ ते २०१७ पर्यंत नियमित सेवाशुल्काचा भरणा केलेला असताना देखील त्यांना मागील सेवाशुल्क भरण्याबाबत नव्याने पाठवण्यात आलेली जाचक बिले, म्हाडा वसाहतीतील बहुतांश घरे अत्यल्प उत्पन्न व मध्यम उत्पन्न गटातील असणे, संस्थांना आलेली लाखोंची व करोडोंची बिले भरणे शक्य नसणे, बहुतांश वसाहतींना म्हाडा मार्फत फक्त पाण्याची सुविधा मिळत असणे, इतर सुविधांसाठी आकारण्यांत येत असलेली रक्कम रद्द करण्याची मागणी, सन १९९८ च्या पासून ज्या संस्थांनी सन दोन हजार सतरा पर्यंत नियमित सेवाशुल्काचा पाळणा केला आहे त्यांना यातून वगळण्याची रहिवाशांची मागणी असणे, या सर्व प्रकारामुळे रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र संतोष याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

बृहन्मुंबईत म्हाडाच्या, मुंबई मंडळाच्या ५६ वसाहती आहेत. सदरहू वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थामधील गाळे धारकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवाबद्दल म्हाडामार्फत सेवाशुल्क आकारले जाते. सदरहू सेवाशुल्कामध्ये जलदेयक, विद्युत देयक, मालमत्ता कर, भूईभाडे, देखभाल खर्च व अकृषीक कर इत्यादींचा समावेश आहे. सदरहू सेवा ह्या विविध प्राधिकरणांकडून (जसे बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी इत्यादी) पुरविल्या जातात. त्यासाठी प्राधिकरणांकडून करांची आकारणी केली जाते. संबंधित प्राधिकरणाकडून सेवांची देयके मुंबई मंडळास सादर केली जातात व त्यानुसार देयकांचा भरणा संबंधीत प्राधिकरणास मुंबई मंडळामार्फत करण्यात येतो. उक्त प्राधिकरणांना सेवाशुल्कापोटी म्हाडामार्फत भरणा करण्यात आलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या रकमेच्या अनुषंगाने म्हाडाकडून सेवाशुल्काची आकारणी करण्यात येते.

उपरोक्त नमूद संबंधित प्राधिकरणांकडून पुरविण्यात येणाऱ्या कर/खर्च इत्यादीमध्ये वेळोवेळी वाढ केली आहे. त्यानुषंगाने म्हाडाच्या मुंबई मंडळाने सन २०१२ ते २०१६ या कालावधीमध्ये त्यानुसार सेवाशुल्कात दरवाढ केली आहे. तथापि, सदरहू दरवाढ प्रत्यक्षात अंमलात आलेली नाही. सन १९९८ पासून ते मार्च, २०२१ पर्यंत उपरोक्त नमूद विविध प्राधिकरणांनी वेळोवेळी केलेली वाढ लक्षात घेवून म्हाडामार्फत सेवाशुल्कात वाढ करण्यात आली आहे.

थकीत सेवाशुल्क/सुधारीत सेवाशुल्काबाबत म्हाडाचा ठराव विचारात घेवून, दि.२२ मार्च २०२१ रोजी अभय योजना लागू करण्यात आली. सदर योजनेत १९९८ ते मार्च २०२१ पर्यंतच्या सेवाशुल्काच्या थकीत रकमेवरील व्याज माफ केले असून गाळेधारकांना थकबाकीची रक्कम ५ वर्षाच्या कालावधीसाठी १० समान हफ्त्यांत भरण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अभिहस्तांतरण होऊन सेवाहस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून फक्त भुईभाडे आकारले जाते.

* * * * * *

लक्षवेधी सूचना क्र.१८५३

# सन २०२३ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्रीमती विद्या ठाकूर, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८५३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या ५६ वसाहतींस वाढीव सेवाशुल्कापोटी आलेली बिले, त्यात म्हाडाने सन २०१७ पासून सेवाशुल्कात केलेली वाढ, काही संस्थाना सन १९९८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सेवाशुल्काचा भरणा करण्याबाबत पाठवलेली बिले, एकेका संस्थेस लाखाची आलेली बिले, संस्थानी १९९८ ते २०१७ पर्यंत नियमित सेवाशुल्काचा भरणा केलेला असताना देखील त्यांना मागील सेवाशुल्क भरण्याबाबत नव्याने पाठवण्यात आलेली जाचक बिले, म्हाडा वसाहतीतील बहुतांश घरे अत्यल्प उत्पन्न व मध्यम उत्पन्न गटातील असणे, संस्थांना आलेली लाखोंची व करोडोंची बिले भरणे शक्य नसणे, बहुतांश वसाहतींना म्हाडा मार्फत फक्त पाण्याची सुविधा मिळत असणे, इतर सुविधांसाठी आकारण्यांत येत असलेली रक्कम रद्द करण्याची मागणी, सन १९९८ पासून ज्या संस्थांनी सन २०१७ पर्यंत नियमित सेवाशुल्काचा भरणा केला आहे त्यांना यातून वगळण्याची रहिवाशांची मागणी असणे, या सर्व प्रकारामुळे रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

बृहन्मुंबईत म्हाडाच्या, मुंबई मंडळाच्या ५६ वसाहती आहेत. सदरहू वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थामधील गाळे धारकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवाबद्दल म्हाडामार्फत सेवाशुल्क आकारले जाते. सदरहू सेवाशुल्कामध्ये जलदेयक, विद्युत देयक, मालमत्ता कर, भूईभाडे, देखभाल खर्च व अकृषीक कर इत्यादींचा समावेश आहे. सदरहू सेवा ह्या विविध प्राधिकरणांकडून (जसे बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी इत्यादी) पुरविल्या जातात. त्यासाठी प्राधिकरणांकडून करांची आकारणी केली जाते. संबंधित प्राधिकरणाकडून सेवांची देयके मुंबई मंडळास सादर केली जातात व त्यानुसार देयकांचा भरणा संबंधीत प्राधिकरणास मुंबई मंडळामार्फत करण्यात येतो. उक्त प्राधिकरणांना सेवाशुल्कापोटी म्हाडामार्फत भरणा करण्यात आलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या रकमेच्या अनुषंगाने म्हाडाकडून सेवाशुल्काची आकारणी करण्यात येते.

उपरोक्त नमूद संबंधित प्राधिकरणांकडून पुरविण्यात येणाऱ्या कर/खर्च इत्यादीमध्ये वेळोवेळी वाढ केली आहे. त्यानुषंगाने म्हाडाच्या मुंबई मंडळाने सन २०१२ ते २०१६ या कालावधीमध्ये त्यानुसार सेवाशुल्कात दरवाढ केली आहे. तथापि, सदरहू दरवाढ प्रत्यक्षात अंमलात आलेली नाही. सन १९९८ पासून ते मार्च, २०२१ पर्यंत उपरोक्त नमूद विविध प्राधिकरणांनी वेळोवेळी केलेली वाढ लक्षात घेवून म्हाडामार्फत सेवाशुल्कात वाढ करण्यात आली आहे.

थकीत सेवाशुल्क/सुधारीत सेवाशुल्काबाबत म्हाडाचा ठराव विचारात घेवून, दि.२२ मार्च २०२१ रोजी अभय योजना लागू करण्यात आली. सदर योजनेत १९९८ ते मार्च २०२१ पर्यंतच्या सेवाशुल्काच्या थकीत रकमेवरील व्याज माफ केले असून गाळेधारकांना थकबाकीची रक्कम ५ वर्षाच्या कालावधीसाठी १० समान हफ्त्यांत भरण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अभिहस्तांतरण होऊन सेवाहस्तातरित करण्यांत आलेल्या आहेत त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून फक्त भुईभाडे आकारले जाते.

*-*-*-*-*-*

रोटा/एच-३२३[ए][७५०-५-२०२३]

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. अनिल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम – १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"जळगाव जिल्ह्यातील अमळनेर परिसरात मोठ्या प्रमाणात वाळूची तस्करी सुरू असल्याचे माहे जानेवारी व फेब्रुवारी २०२३ मध्ये वेळोवेळी निदर्शनास येणे, अवैध वाळू वाहतुकीला विरोध करणाऱ्या तरुणाचा अंगावर ट्रॅक्टर घालून खून केल्याची गंभीर घटना मांडळ ता. अमळनेर येथे १६ जानेवारी २०२३ रोजी घडणे, या परिसरात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीस पायबंद घालण्यास महसूल प्रशासन अपयशी ठरल्यामुळे ही घटना घडल्याची आरोप करून नातेवाईक व नागरिकांनी मृतदेह तहसीलदार कार्यालयात आणून ठेऊन निषेध नोंदवणे, सदरील घटनेनंतर योग्य त्या गांभीर्याने कारवाई न केल्यामुळे वाळू तस्कर अद्यापही मोकाट फिरणे, सदर तरुणाच्या कुटुंबीयास शासनाने मदत करण्याची गरज असणे, आव्हाने परिसरातील गिरणा नदीपात्रात बेकायदेशीर वाळू उपसा सुरू असल्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडणे, तापी पात्रातील वाळू गटांचा लिलाव पूर्ण होण्यापूर्वीच वाळू तस्करांनी बेकायदा वाळू उपसा सुरू करणे, गिरणा नदीपात्रातील वाळू तस्करांविरोधात कारवाई करण्यासाठी जळगाव जिल्हाधिकारी स्वत: जाणे, मात्र कारवाईची माहिती त्यापूर्वीच बाहेर पडल्याने वाळू तस्कर सावध होणे, सदर संपूर्ण वाळू तस्करीची चौकशी होऊन कडक कारवाई करण्याची गरज तसेच वाळू वाहतुकीवर नियंत्रणासाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्याची गरज याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यात दिनांक ०१/०४/२०२२ ते ३०/०२/२०२३ या कालावधीत ४८ वाहनांवर कारवाई करुन रु.४७,३३,९६९/- एवढ्या दंडात्मक रक्कमेची आकारणी करण्यात आली आहे.

श्री. जयवंत यशवंत कोळी, रा.मांडळ यांचा त्यांच्या शेतात मृत्यु झाल्याची घटना दिनांक १६/०१/२०२३ रोजी घडली आहे. श्री. जयवंत यशवंत कोळी यांनी त्यांच्या शेता शेजारील रस्त्याने चोरीच्या वाळूची वाहतूक करण्यास अशोक लखा कोळी व इतर पाच ते सहा व्यक्तींना विरोध केल्याने सदर व्यक्तींनी त्यांना ठार केल्याबाबत मृत

व्यक्तींच्या पत्नीने पोलीस स्टेशन, मारवड येथे दिनांक १७/०१/२०२३ रोजी फिर्याद दाखल केली आहे.

सदर फिर्यादीनुसार पोलीस स्टेशन, मारवड येथे आरोपी अशोक लखा कोळी व इतर पाच यांच्याविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३०२ व ३४ नुसार दिनांक १७/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ७ आरोपीना अटक केली असून सदर आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

जळगाव तालुक्यातील आव्हाणे व खेडी येथील गिरणा नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा करतांना जानेवारी २०२३ वा त्या दरम्यानच्या कालावधीत तहसिल कार्यालयाच्या पथकाने ३ वाहनांवर गुन्हे दाखल करुन दंड वसूलीची कारवाई सुरु आहे.

वाळूचे व इतर गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक होऊ नये यासाठी अमळनेर तालुक्यात तालुका स्तरावर बैठे पथकांची तसेच, भरारी पथकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतूक होऊ नये यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग व उपप्रादेशीक परिवहन विभाग यांच्यामार्फत संयुक्त तपासण्या केल्या जातात. अधिकारी/कर्मचारी यांच्यावर पाळत ठेवणा-या व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०९ अन्वये कारवाही करण्याबाबत पोलीस विभागाला वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच जळगाव जिल्हयात दिनांक ०१/०४/२०२२ ते २८/०२/२०२३ दरम्यान एकूण ५१९ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ७२२.८९ लाख दंडाची आकारणी करण्यात आलेली असुन रक्कम रुपये ३८५.०८ लाख दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तसेच ६६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

*******

**लक्षवेधी सूचना क्रमांक-९२८**

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. बंटी भांगडिया,श्री. संजय केळकर,श्री. योगेश सागर,श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"रत्नागिरी जिल्ह्यातील खेड शहरातील तहसिलदार व पोलीस यंत्रणेने गेल्या काही वर्षांत विविध कारवायांमध्ये ताब्यात घेतलेले साहित्य तहसिलदार कार्यालयाच्या आवारात धोकादायक पद्धतीने ठेवले असल्याचे फेब्रुवारी २०२३ च्या दुस-या आठवड्यात उघडकीस येणे, सतत वर्दळ असलेल्या भागात अपघातग्रस्त वाहने, वाळू उपसा करणारे सक्षकन पंप आदी साहित्य अस्तव्यस्थ पडलेले असणे, त्यामुळे तेथे निर्माण झालेली अडगळ, त्यामुळे तेथे विषारी साप, विंचु, डास यांचे वाढलेले प्रमाण, यामुळे नागरिकांच्या जीवास धोका निर्माण झालेला असणे, संबंधीत यंत्रणेने त्याची दखल घेण्याची मागणी नागरिकांनी वारंवार केली असणे, परंतु सदरहू मागणीकडे यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने तातडीने नागरिकांच्या जीवाला धोका होऊ नये याची काळजी घेण्याकरीता करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया."

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

तहसिलदार, खेड, जिल्हा रत्नागिरी कार्यालयाच्या आवारत तहसिलदार, खेड यांची नादुरुस्त जीप, महसूल विभागाकडून जप्त केलेले ४ सक्शन पंप तसेच, रोड अपघातामध्ये नादुरुस्त झालेली वाहने पोलीस विभागामार्फत ठेवण्यात आलेली आहेत. सदरचे वाहनांची औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खेड यांचेमार्फत किंमत निश्चित ठरविणेत येऊन, लिलावाची जाहिर प्रसिध्दी देण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच सदरच्या वाहनांचे संदर्भात आजमितीस कोणीही दावाहक्क प्रकरण दाखल केलेले नाही.तसेच पोलिस प्रशासनास या कार्यालयाकडील पत्र क्रमांक. गौणखनिज/कावि/वाहने /२०२३ दिनांक २९/०३/२०२३ अन्वये सदरचे साहित्य अथवा अपघातग्रस्त वाहने यांची सुनियोजितपणे व कायदेशीर पध्दतीने विल्हेवाट लावणेबाबत कळविणेत आलेले आहे. सदर प्रकरणी माहे फेब्रुवारी २०२३ पर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

*******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात शासकीय खेळाडूंचे ५ टक्के आरक्षण बाबतचे बोगस प्रमाणपत्र देऊन शासकीय नोकरी मिळविलेल्या बोगस खेळांडूवर कारवाई करुन व त्यांचे बोगस प्रमाणपत्र रद्द करणेसंदर्भात मा. क्रिडा आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मा. पोलीस महासंचालक यांना दि.३० सप्टेंबर २०२१ लेखी निवेदन देऊन त्यास दोन वर्षे इतका कालावधी होऊनही अद्याप याबाबत शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याची धक्कादायक बाब दि.१३.३.२०२३ रोजी निदर्शनास येणे, महाराष्ट्र शासनाच्या क्रिडा विभागाच्या वेबसाईडवर प्रमाणपत्र रद्द केलेल्या खेळाडूंचे नावे देखील उपलब्ध असताना अद्याप त्यांच्यावर शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदरहू बोगस खेळाडूंमध्ये राज्य शासनाच्या वर्ग १ ते वर्ग ४ पर्यंतचे कर्मचाऱ्यांचा सहभाग असून अशा या खेळाडूंना बोगस प्रमाणपत्र काढून देण्यासाठी शासनाच्या क्रिडा विभागातील क्रिडा अधिकारी व क्रिडा उप संचालक यांनी आर्थिक व्यवहार करुन मदत केल्याचा प्रकार उघडकीस येणे, शिवाय ज्या बोगस खेळाची प्रमाणपत्रे काढून देण्यात आलेली आहेत अशा खेळांच्या संघटनेवर क्रिडा विभागातील अधिकारी अथवा त्यांचे नातेवाईक कार्यरत असल्याने अशा खेळांच्या संघटनेवर कारवाई होणे आवश्यक असणे, ५ टक्के खेळाच्या आरक्षणाचा लाभ बोगस खेळाडू घेत असल्यामुळे प्रामाणिक खेळाडूंना शासकीय नोकरी मिळण्याच्या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील कर्तव्य बजावून राज्य व देशासाठी खेळणाऱ्या प्रामाणिक खेळाडूंमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

---

मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे निवेदन

शासकीय व निमशासकीय सेवेत अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना ५ टक्के आरक्षण लागू करण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना दि.१ जुलै,२०१६ च्या व तदनुषंगिक शासन निर्णयान्वये निर्गमीत करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयानुसार ५ टक्के खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरविण्यात आलेले खेळाडू विविध विभागांद्वारे राबविण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेसाठी सहभागी होत असतात. ५ टक्के खेळाडू आरक्षणासंदर्भातील सूचनांनुसार कार्यवाही करताना काही खेळाडूंनी बनावट क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीचा अहवाल प्राप्त करुन घेतल्याचे आढळून आले. त्यानुसार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांनी अशा उमेदवारांची क्रीडा वैधता प्रमाणपत्र रद्द करुन, सदर उमेदवार आता खेळाडू आरक्षणाची अर्हता धारण करीत



d:\dnyaneshwar\education\sp-7\chetan\adhiveshan\लक्षवेधी सूचना\अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२३\४.त.१५-२०२३ श्री सुनिल प्रभु, वि स स .docx

नसल्याबाबतचा अहवाल, योग्य त्या कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक यांना दि.०५.०७.२०२१ च्या पत्रान्वये सादर केला आहे. तसेच इतर विभागात रुजू असलेल्या बोगस खेळाडू उमेदवारांचे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल रद्द करुन, सदर उमेदवारांचा विभागनिहाय तपशील क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

जे शासकीय कर्मचारी त्यांच्या मूळ नेमणूकीसाठी पात्र नव्हते अथवा अर्हताप्राप्त नव्हते असे नंतर आढळून येईल त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत सा.प्र.वि. च्या दि.१२.१०.१९९३ च्या शासन निर्णयान्वये सूचीत करण्यात आले आहे. त्यानुसार बनावट क्रीडा प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत विविध आस्थापनांवर कार्यरत असलेल्या उमेदवारांविरुद्ध त्या-त्या उमेदवाराच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाकडून/ सक्षम शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांकडून कारवाई करण्याबाबत संबंधित विभागांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२६.०४.२०२२ च्या पत्रान्वये सूचीत करण्यात आले आहे. त्यानुसार सदर उमेदवारांवर सामान्य प्रशासन विभागाच्या सूचनांनुसार कारवाई करण्यासाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या स्तरावरून संबंधित विभागांस अवगत करण्यात आले आहे. सदर उमेदवारांविरुद्ध सामान्य प्रशासन विभागाच्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार कार्यवाही करताना २० उमेदवारांना विविध विभागांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच इतर बोगस क्रीडा प्रमाणपत्रांआधारे ज्या उमेदवारांवर संबंधित विभागांनी बडतर्फीची कारवाई सुरू करण्यात आली आहे, त्यापैकी बहुतांश उमेदवारांनी सदर कारवाईविरुद्ध विविध न्यायालयांमध्ये मूळ अर्ज दाखल केले आहेत. मा.न्यायालयांनी सदर प्रकरणी संबंधित उमेदवारांना पुढील सुनावणीपर्यंत बडतर्फ करण्यात येऊ नये असे आदेशीत केले आहे. त्यामुळे शासन सेवेत रुजू सर्व बोगस खेळाडूंना अद्याप शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले नाही. शासन सेवेत रुजू झालेल्या बोगस खेळाडू उमेदवारांच्या विरुद्ध तात्काळ कारवाई करण्यासंदर्भात, प्रशासकीय विभागांना परिपत्रकाद्वारे सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

क्रीडा स्पर्धेच्या पर्याप्त व अधिकृत अभिलेखाशिवाय, खेळाडूस प्रमाणपत्र पडताळणी करुन दिल्या प्रकरणी क्रीडा विभागातील उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा व क्रीडा अधिकारी,गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांना निलंबीत करुन संबंधितांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९७९ च्या नियम ७ मध्ये, ज्या संघटनेची उद्दिष्ट्ये किंवा कार्य भारताच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला किंवा सुव्यवस्थेला किंवा नैतिक मूल्यांना बाधक असतात, अशा संघटनेत शासकीय कर्मचारी सहभागी होऊ शकणार नाही किंवा त्याचा सदस्य राहू शकणार नाही, अशी तरतूद नमूद आहे. विविध खेळ संघटनांवर कार्यरत क्रीडा विभागातील अधिकारी, कर्मचारी कार्यरत असलेल्या खेळ संघटना या उपरोक्त नियमास बाधक ठरत नाहीत. त्यामुळे केवळ एखाद्या संघटनेवर शासकीय सेवक कार्यरत आहे, म्हणून सदर संघटनेवर कारवाई करण्याची बाब नियमोचित ठरत नाही.

ज्या बोगस खेळाडू उमेदवारांना शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे, अशा उमेदवारांच्या जागी, शासन नियमांनुसार पात्र खेळाडूंची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागांद्वारे करण्यात येत आहे. बोगस क्रीडा प्रमाणपत्राआधारे ५ टक्के खेळाडू आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांना आळा घालून प्रामाणिक खेळाडूंना लाभ देण्याच्या दृष्टीने, ५ टक्के खेळाडू आरक्षणाची ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

------

लक्षवेधी सूचना

डॉ. राहूल आहेर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २१४० पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक जिल्हयाचा टंचाई अंतर्गत गांव, वाडी, वस्ती यांना टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी टँकर मंजुर करतांना शासन नियमानुसार सर्व प्रथम जिल्हयात उपलब्ध असलेले शासकिय टँकरव्दारे पाणी पुरवठा करणेबाबत निर्देश असल्याने शासकिय विभागांकडे उपलब्ध असलेले टँकर यांचे पाणी पुरवठा करणेबाबत आदेश होणे, सदर शासकिय टँकर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर सर्वाधित तालुक्याचे गटविकास अधिकारी हे स्थानिक पातळीवर डिझेल पुरवठादार यांचेशी संपर्क साधुन टँकरसाठी शासनाकडून निधी उपलब्ध होईल व त्यांव्दारे त्यांचे देयकाचे वितरण केले जाईल या अटीवर डिझेल पुरवठा करणेबाबत विनंती करत असणे, या टंचाई कालावधीत नाशिक जिल्हयात एकूण १४ शासकिय टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरू असणे, सदरच्या तालुक्यांना टँकरव्दारे माहे एप्रिल २०२२ ते जून २०२२ या कालावधीत नियमितपणे सुरु असणे, यासाठी सुमारे ३ महिन्याचा कालावधी होऊन गेल्याने व शासनाकडुन निधी प्रलंबीत असल्याने संबंधीत डिझेल पुरवठादार यांनी संबधीत गटांकडे देयक मिळणेबाबत विनंती केलेली असल्याने गटविकास अधिकारी यांनी शासनाकडे वारंवार मागणी करणे, परंतु सदरचा निधी अद्याप अप्राप्त असणे, यामध्ये चांदवड ५४५५००० व देवळा २२००००० निधी प्रलंबित असणे, नाशिक जिल्ह्याचे एकूण ५४४६६१० इतका निधी प्रलंबित असणे, आगामी काळातही पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाकडून टँकरद्वारे पुरवठा होणार असल्याने प्रलंबित देयके तात्काळ देणे गरजेचे असणे, त्यामुळे याबाबत शासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

राज्यात ग्रामीण भागातील गावांच्या/वाडयांच्या/वस्त्यांच्या १ कि.मी. परिसरातील सार्वजनीक उदभवातून दरडोई दर दिवशी २० लिटरपेक्षा कमी पाणी उपलब्ध होण्याची शक्यता असल्यास संबंधित जिल्हाधीकारी यांना अशा ठिकाणी टंचाई घोषीत करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. टंचाई घोषीत केल्यानंतर ती निवारण्याकरिता परिभाषित केलेल्या १० उपाययोजनापैकी किमान खर्चीक योजना राबविण्यासाठी स्थायी आदेशान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. टँकरने पाणी पुरवठा

करण्याची उपाययोजना इतर उपाययोजना त्या क्षेत्रात/भागात अस्तीत्वात येऊ शकत नसल्यास, शेवटचा पर्याय म्हणून योजण्यात येते.

सदर उपाययोजना उपयोगात आणताना शासनाचा खर्च किमान व्हावा याकरिता शासकीय टँकर उपयोगात आणले जातात. शासकीय टँकर अपुरे पडत असल्यास अथवा उपलब्ध नसल्यास खाजगी टँकरचा विचार करण्यात येतो.

नाशिक जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२१ ते जून, २०२२ या टंचाई आराखड्यानुसार टँकरने पाणीपुरवठा करणे व खाजगी विहीर अधिग्रहण करणे या दोन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात आलेली होती. माहे एप्रिल, २०२२ च्या सुरुवातीच्या कालावधीत नाशिक जिल्हायात एकूण ३ गावाकरिता २ शासकीय टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला असून माहे जून, २०२२ मध्ये ९२ गावे व १६१ वाड्याकरिता १४ शासकीय व ७१ खाजगी असे एकूण ८५ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. तर, ७८ खाजगी विहिरी अधिग्रहण करण्यात आल्या होत्या.

सदर टंचाई कालवधीत टंचाई निवारणार्थ घेण्यात आलेल्या उपाययोजनांपैकी खाजगी टँकरने पाणी पुरवठा केलेल्या देयकांसाठी रु. ४ कोटी २९ लाख १५ हजार व खाजगी विहीर अधिग्रहण करण्याकरीता खर्ची पडलेल्या देयकांसाठी रु. ४६ लाख ५६ हजार अशी एकूण रु.४ कोटी ७५ लाख ८१ हजार इतक्या निधीची मागणी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी शासनाकडे केली आहे. मात्र, त्यामध्ये शासकीय टँकरच्या इंधन खर्चाकरीता निधीची मागणी करण्यात आलेली नाही.

राज्यात टंचाई निवारणार्थ घेण्यात आलेल्या उपाययोजनांसाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये रु. ९३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला. त्यापैकी टंचाई कालावधी सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालवधीतील देयकांसाठी रु. ९२ कोटी ९८ लाख २९ हजार इतका निधी क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत करण्यात आलेला आहे.

सदर निधी वगळता, टंचाई निवारणार्थ योजिलेल्या विविध उपाययोजनेवरील खर्चापोटी देयकाची अदायगी करण्यासाठी चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मंजूर झालेल्या पुरक मागणीद्वारे प्राप्त निधीतून क्षेत्रीय कार्यालयांना मार्च, २०२३ अखेरपर्यंत निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे, त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील प्रलंबित देयकांचाही समावेश आहे.

-------------

## लक्षवेधी सूचना

**श्री. अतुल भातखळकर, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. अबू आजमी वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.६ वरील निवेदन खालीलप्रमाणे आहे:-**

"मुंबई, कांदिवली येथे १०६४ लिटर भेसळयुक्त दूधसाठा जप्त करुन नष्ट केल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, अन्न आणि औषध प्रशासनाने पदार्थाचे नमुने घेऊन तपासणी केली असता सर्वाधिक भेसळ दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळून येणे, परंतु, अन्न आणि औषध प्रशासनामध्ये मनुष्यबळाची कमतरता आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे उत्पादनाच्या नमुन्यांची चाचणी करण्यात अवास्तव विलंब होत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये, अन्न आणि औषध प्रशासन विभागातील ११५ मंजूर पदांपैकी ५१% पदे रिक्त असणे, त्यामुळे पद भरतीचे नियम शिथिल करण्यासंदर्भात ठोस पाऊले उचलण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

कांदिवली (पू) येथे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी व गुन्हे नियंत्रण शाखा, मुंबई आणि समतानगर पोलीस ठाणे यांच्या संयुक्त पथकाने दूधविक्री करणाऱ्या ०५ घरांवर धाडी टाकल्या असता त्या ठिकाणी मिल्क टॅम्परिंग करीत असल्याचे आढळून आले. सदर प्रकरणी दूधाचे एकुण ०९ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात घेवून उर्वरित १०६४ लीटर (रु. ६२,००९ किमतीचे) भेसळयुक्त दुधाचा साठा जप्त करण्यात आला. सदर साठा भेसळीच्या संशयावरुन नष्ट करण्यात आला आहे. सदर भेसळयुक्त दुधाचे नमुने अन्न विश्लेषक यांनी तपासून अप्रमाणित घोषित केले आहे. या प्रकरणातील एकूण ०६ आरोपींवर समतनागर पोलीस ठाणे, कांदिवली (पू) येथे भां.द.वि. गु.र. क्र. २४/२०२३ दाखल करण्यात येवून अन्न सुरक्षा कायद्यामधील कलमांतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

तसेच, बृहन्मुंबई विभागात सन २०२२-२३ मध्ये दुधाचे एकूण १०२ अन्न नमुने घेण्यात आले असून त्यापैकी ४८ अन्न नमुने प्रमाणित आढळून आले आहेत. उर्वरीत ०९ अन्न नमुने कमी दर्जाचे, ०१ अन्न नमुना लेबल दोष पैकी ३ प्रकरणी न्यायनिर्णय दाखल करण्यात आले असून, ०१ अन्न नमुना प्रकरणी तडजोड दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत ६ कमी दर्जाच्या अन्न नमुन्यांप्रकरणी न्यायनिर्णय दाखल करण्यात येत आहे. भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांमधील प्रकरणी सुध्दा अशाच प्रकारच्या कायदेशीर कारवाया अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येत आहेत.

सद्यस्थितीत, अन्न व औषध प्रशासनाच्या ३ प्रयोगशाळांमध्ये औषध विभागासाठी ११५ मंजूर पदांपैकी ५५ पदे भरली असून ६० पदे रिक्त आहेत. या ६० रिक्त पदांवर नियमित भरती प्रक्रिया सुरु आहे. ही नियमित भरती होईपर्यंत प्रयोगशाळांच्या कामकाजावर विपरीत परिणाम होऊ नये, म्हणून ३५ बेंच केमिस्ट व १४ प्रयोगशाळा सहायक अशी वर्ग-३ ची एकूण ४९ तांत्रिक पदे बाह्ययंत्रणेद्वारे/कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आली आहेत. अन्न व औषध प्रशासनामधील औषध विभागातील अधिकारी व कर्मचारी अन्न विभागात काम करून अधिकतम क्षमतेने अन्न नमुने विश्लेषणाचे कामकाज प्रयोगशाळांमध्ये करत आहेत. त्याचप्रमाणे, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ साठी अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) यांनी अन्न व औषध प्रशासनासोबत "अन्न सुरक्षा कार्यप्रणालीचे बळकटीकरण" ही योजना राज्यात राबविण्यासाठी सामंजस्य करार केला असून या योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून राज्यातील ३ प्रयोगशाळांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम जलदगतीने सुरु आहे. उच्चस्तरीय सचिव समितीच्या सोमवार, दि. ०६.०३.२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अन्न व औषध प्रशासनाअंतर्गत कार्यरत प्रयोगशाळांमधील अन्न विश्लेषणाच्या कामकाजासाठी एकूण ६० मनुष्यबळाच्या मर्यादेत सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेस ३ वर्षाची मुदतवाढ (सन २०२५-२६ पर्यंत) मिळाली असून, पुढील ३ वर्षात राज्यातील ३ प्रयोगशाळांमध्ये अधिकच्या पायाभूत सुविधा उपलब्ध होऊन, अन्न नमुन्यांचे विश्लेषण जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.

तसेच, औषध निरीक्षक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमात असलेल्या अनुभवाची अट वगळून सुधारीत सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर सेवाप्रवेश नियम अंतिम स्वरुपात प्रसिध्द झाल्यानंतर औषध निरीक्षकांची पदे भरण्याबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात येईल. अन्न व औषध प्रशासनातील गट-अ संवर्गातील २४ पदांचे व गट-ब संवर्गातील १९७ पदांचे रिक्त पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठविण्यात आलेले आहेत. अन्न व औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकारी व औषध निरीक्षक संवर्गातील रिक्त पदांची संख्या जास्त असल्याने, सदर संवर्गातील रिक्त पदे काही कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

*****************************************************************

लक्षवेधी सूचना क्र.९९

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

श्री. अतुल भातखळकर, श्री. दिलीपराव बनकर, श्री. दिपक चव्हाण, श्री. हसन मुश्रीफ, श्री. बाळासाहेब पाटील, श्री. बाबासाहेब पाटील, श्री. दिलीप मोहिते-पाटील, श्रीमती सरोज आहिरे, श्री. बाळासाहेब आजबे, श्री. शेखर निकम, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. चेतन तुपे, श्री. मंगेश चव्हाण, श्री. गणपत गायकवाड, श्री. कुमार आयलानी, डॉ. किरण लहामटे, श्री. पृथ्वीराज चव्हाण, श्री. संजय बनसोडे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री सुनील राणे वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे :-

"बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजने अंतर्गत रस्त्यावर कुठेही अपघात झाल्यास रुग्णाला ७२ तास मोफत औषधोपचार करण्याचा निर्णय होऊनही अद्यापावेतो त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, तसेच, या योजने अंतर्गत एकूण ७४ प्रकारच्या उपचार प्रक्रियांसाठी ३० हजार रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले असणे, परंतु, अद्याप पर्यंत योजनेची अंमलबजावणी न होणे, त्यामुळे, ही योजना प्रत्यक्षात सुरु करून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

प्रा. डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

राज्यातील अपघातग्रस्त रुग्णांना गोल्डन अवरमध्ये उपचार मिळावा व लवकरात लवकर जवळच्या रुग्णालयात स्थलांतरित करण्याचे उद्दीष्ट विचारात घेऊन, अपघातग्रस्त रुग्णांना विमा संरक्षणाव्दारे नि:शुल्क वैद्यकीय उपचार उपलब्ध करण्याकरिता दिनांक ७ जून, २०१६ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेस तत्वत: मान्यता देण्यात आलेली होती.

अपघात ग्रस्त रुग्णांना गोल्डन आवर मध्ये उपचार मिळाला व रुग्णांना जवळच्या रुग्णालयात स्थलांतरित केले तर मृत्यूचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. विशेषत: अस्थिभंग च्या रुग्णांना तांत्रिक दृष्ट्या योग्य पद्धतीने स्थिर करून स्थलांतरित केल्यास त्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तसेच अपघातग्रस्त रुग्णास रक्तस्त्राव होत असेल व अशा रुग्णास वेळेवर स्थलांतरित केल्यामुळे रक्त व रक्तघटक मिळून रुग्णाचे प्राण वाचतील. तसेच हेड इन्जुरी च्या रुग्णांना वेळेवर ऑक्सिजन देऊन व योग्य पद्धतीने स्थलांतरित केल्यास अशा रुग्णाचे मृत्यू व मेंदूची इजा कमी होण्यास मदत होईल. या दृष्टीने दिनांक १६ सप्टेंबर,२०२० रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राबविण्यास

मान्यता देण्यात आली. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाकडून दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

त्यानुसार रस्ते अपघात झालेल्या व्यक्तीस पहिल्या ७२ तासांपर्यंत तत्पर वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी ७४ उपचार  निश्चित करण्यात आले होते. सदर उपचारांवरील खर्चाकरीता प्रति रुग्ण प्रति अपघात रुपये रु.३०,०००/- पर्यतचे विमा संरक्षण अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली होती. या योजनेअंतर्गत महाराष्ट्राच्या भौगिलिक सीमेतील कोणत्याही रस्त्यांवर अपघांतामध्ये गंभीररित्या जखमी झालेल्या व वैद्यकीय उपचाराची तात्काळ आवश्यकता असलेल्या व्यक्ती (अधिवासाच्या अटीशिवाय) या योजनेचा लाभ घेण्यास अनुज्ञेय आहेत. राज्यामध्ये सध्या पात्र अपघातग्रस्त लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या एकत्रीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत ४० आपात्कालीन आणि पॅालीट्रामासाठी असणाऱ्या पॅकेजेसच्या माध्यामातून अपघातग्रस्तास निशुल्क उपचार देण्यात येत आहेत.

दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार सदर योजना विमा कंपनी मार्फत राबविण्याबाबत मंजुरी देण्यात आली होती. तथापि ही योजना हमी तत्वावर राबविल्यास शासकीय निधीची बचत होईल हे लक्षात घेऊन अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील विमा कंपनी निवड  समितीच्या दिनांक १२ मार्च, २०२१ च्या बैठकीमध्ये योजना हमी तत्वावर राबवण्याची शिफारस करण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध व्यापक सुधारणा मुख्य कार्यकारी अधिकारी,राज्य आरोग्य हमी सोसायटी यांनी प्रस्तावीत केल्या आहेत. स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राबविण्याबाबत दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या अपघाता संदर्भातच्या सर्वच उपचारांचा समावेश महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्येच करण्याचे प्रस्तावीत आहे.

---

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधीवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२४०८**

मा. ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. राजेश एकडे, श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.

" रिध्दपूर- तिवसा रा.मा.३०० मार्गावरील नेरपिंगळाई (ता. मोर्शी, जि. अमरावती) ०.०० कि.मी. ते ४०/८०० कि.मी. रस्त्याचे काम अत्यंत धिम्या गतीने होत असून गावातील नागरीकांच्या रहदारीकरीता रस्ता गैरसोयीचा होणे, तसेच या रस्त्यांच्या कामामुळे, सांडपाण्याची, व पिण्याची पाईपलाईनची सतत लिंकेज होत असल्यामुळे नागरीकांना गढूळ पाण्याचा पुरवठा होत असणे, सदर रस्त्याचे काम करताना भूमी अभिलेख कार्यालयाने खुणा करुन दिल्या तेवढे अतिक्रमण काढले नसणे, गरज नसतांना गरीबांची घरे पाडणे, ठेकेदार कंपनी (माधव इन्फ्रा) व सार्वजनिक बांधकाम विभाग याच्यात समन्वय नसणे, स्थानिक प्रशासन कंपनीला सहकार्य करीत नसणे, तत्कालीन पालकमंत्री यांनी प्रशासन, ग्रामस्थ यांच्यासमवेत १४/६/२०२२ रोजी घेतलेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कोणतेही काम न होणे, बैठकीमध्ये झालेल्या लेखी इतीवृत्त प्रमाणे पुढील कामे वेळीच पुर्ण होणे, इलेक्ट्रिक पोल मनात वाटेल त्याप्रमाणे उभे केल्यामुळे स्ट्रीट लाईटची अडचण निर्माण होणे, येथे काम करताना ग्रामपचायतील विश्वासात घेतले नसणे, अनेकवेळा पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया जाणे, गावातला पाणीपुरवठा अनियमित होणे, त्याचा आर्थिक भुर्दंड ग्रामपंचायतीला सोसायला लागणे, येथील नाल्याचे काम झाले नसल्याने नागरीकांच्या घरात सांडपाणी शिरुन नुकसान होणे, नागरीकांच्या आरोग्याच्या वारंवार तक्रारी असणे, गावामधील ७०० मीटर अंतराचे काम मागील दिड वर्षापासून रखडले असणे, गावातील नागरीक वारंवार आंदोलने, उपोषण करणे, त्यामुळे स्थानिक नागरीकांमध्ये रोष निर्माण होणे, हे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी येथील नागरीकांची असतानाही या समस्यांकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरीकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया. "

---

**श्री. रविंद्र चव्हाण, मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)यांचे निवेदन.**

रिध्दपूर – तिवसा रस्ता रा.मा. ३०० भाग रिध्दपुर ते तिवसा कि.मी. ०/०० ते ४०/८०० ता. मोर्शी आणि तिवसा जि. अमरावती लांबी ४०.८०० कि.मी. या रस्त्याचे काम अशियाई विकास बॅंक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्प अतंर्गत प्रगतीत आहे.

सद्यस्थितीत ४०.८० कि.मी. लांबी पैकी ३३.०० कि.मी. काम पूर्ण झाले आहे. वन विभागातील ६.५ कि.मी. व नेरपिंगळाई गावातील १.३०० कि.मी. लांबीतील काम प्रगतीत असून सदर चे काम जून २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

गावातील नवीन पाईपलाईन चे खोद काम करत असताना जून्या पाईप लाईन क्षतीग्रस्त झाल्या होत्या तथापि आवश्यक ती दूरूस्ती वेळोवेळी करून नागरीकांना गढूळ पाण्याचा पूरवठा होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

सदर रस्त्याकरीता भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करण्यात आली होती सदर जागा उपल्बध करून देताना एका घराचे झालेले नुकसान करीता संबंधीत कंत्राटदारामार्फत मोबदला देण्यात आला आहे.

नेरपिंगळाई गावातील विद्युत खांबाचे काम करतांना ना दुरुस्त होणा-या पाईप लाईन कंत्राटदारामार्फत त्वरीत पूर्ण करुन नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

दि.१४.०६.२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सूचनाच्या अनुषंगाने पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन चे काम व रस्ताच्या बाजूला पेव्हिंग ब्लाक ऐवजी करावयाच्या कॉक्रीटचे काम प्रगतीत असून जून २०२३ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

****

२४६३

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन-२०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**श्री. शांताराम मोरे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४६३**

**<u>लक्षवेधी सूचना</u>**

**"महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील राज्य मार्ग क्रमांक १७० हातिवले ते चिरेखन फाटा ०.०० ते २३.७०० की मी रस्त्याचे काम सुरू असून ६७ कोटी रुपयाची प्रशासकीय मान्यता आणि ४१ कोटी रुपयाला हा ठेका अलुर कन्स्ट्रक्शन कंपनी अँड नाईक अँड सन्स या कंपनीने घेतला असणे, या रस्त्यावर बेकायदेशीरपणे आणि वाहन चालकांच्या जीवितास धोका होईल असे स्पीड ब्रेकर गरज नसताना अनेक ठिकाणी टाकण्यात आलेले असणे,सदरील ठेकेदार हा कर्नाटक राज्यातील असून बेजाबाबदारपणामुळे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेकांचे मोठे नुकसान झालेले असणे,याअगोदर स्थानिक नागरिकांनी अनेक तक्रारी करून देखील प्रशासन हेतुपूर्वक दुर्लक्ष करत असणे,याचाच दुष्परिणाम म्हणून दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी दैनिक प्रहार चे पत्रकार आणि राजापूर तालुका प्रेस क्लबचे उपाध्यक्ष राजन लाड आणि त्यांची पत्नी या दोघांचे स्पीड ब्रेकर मुळे मोठा अपघात झलेला असणे, या अपघातात फार मोठे शारीरिक आणि आर्थिक नुकसान झालेला असणे,याचबरोबर याअगोदर देखील अनेक वाहन चालकांचा या स्पीडब्रेकर मुळे अपघात झाले असून अनेक गाड्यांचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असणे, यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील हातिवले जैतापूर रस्त्यावर चुकीच्या पद्धतीने आणि अनेकांना धोकादायक ठरलेल्या स्पीड ब्रेकर काढण्याबाबत मागणी होऊन देखील दुर्लक्षित केल्याने येथील स्थनिकंमध्ये सदर ठेकेदार व प्रशासनाविरोधत असंतोषाची व चिडेची भावना निर्माण होणे,वेळेवर कार्यवाही न केल्यास जनभवणांचा उद्रेक होण्याची निर्माण झालेली शक्यता आणि शासनाने यावर त्वरित करावयाची कारवाई व उपाययोजना ."**

**<u>मा.श्री. रविंद्र चव्हाण, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन</u>**

हातिवले जैतापूर रस्ता रा.मा.१७० कि.मी.०/०० ते २३/७०० या रस्त्याची सुधारणा करणे हे काम आशियाई विकास बँक अंतर्गत मंजूर असून सद्य:स्थितीत प्रगतीत आहे. सदर कामाला रु. ६२.७० कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाची मे.एस.एस.अलूर कन्स्ट्रक्शन कंपनी, विजयापूर यांचे नांवे निविदा निश्चिती होऊन कार्यारंभ आदेश विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. एनआरडी/एबी/टीसी/२०१९-२०/९४५, दि.०४/०२/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. या कामाची स्विकृत निविदेची किंमत रु. ५१.८० कोटी आहे. सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ ला हातिवले येथे सुरू होऊन चिरेखाण फाटा येथे प्र.रा.मा.क्र.४ (रेवस रेड्डी रस्ता) जवळ संपतो. या रस्त्याची एकूण लांबी २३.७० कि.मी. आहे. सदर रस्ता राजापूर तालुक्यातील प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्पाकडे जाणारा प्रमुख रस्ता आहे.

या कामामध्ये या रस्त्याची संपूर्ण लांबी IRC मानकानुसार विकसित करण्यात येत असून रस्त्याची एकूण रूंदी **१२.०० मीटर** व डांबरीपृष्ठभागाची रूंदी **७.०० मीटर** करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून रोड फर्निचर व इतर संकीर्ण बाबी प्रगतीत आहेत.

या रस्त्याचे DBM पर्यंतचे काम मे-२०२२ मध्ये करण्यात आले असून BC चे काम **माहे नोव्हेंबर-२०२२ ते माहे फेब्रुवारी-२०२३** दरम्यान करण्यात आले आहे. सदर रस्त्यावर गतीरोधक घालावेत अशी विनंती पडवे, डोंगर या ग्रामपंचायतींकडून व दत्तवाडी महाविद्यालय, दत्तवाडी ता.राजापूर यांचेकडून लिखित स्वरूपात मागणी करण्यात आली होती. दरम्यान डोंगर तिठा (कि.मी. ११/७००) येथे दि. **१४/०१/२०२३** रोजी ट्रक चालकाने अतिवेगाने व निष्काळजीपणे वाहन चालविल्याने अपघात झाल्याची व सदर अपघातात एका व्यक्तीचे अपघाती निधन झाल्याची पोलीस स्टेशन, राजापूर येथील FIR मध्ये नोंद आहे. या घटनेनंतर गतीरोधक घालणेबाबतची ग्रामस्थांच्या मागणीची तीव्रता वाढली. या अनुषंगाने पोलीस निरिक्षक, राजापूर व मा.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, रत्नागिरी प्रतिनिधी यांचे समवेत उप अभियंता, सा.बां. उपविभाग, राजापूर यांनी दि. **१९/०१/२०२३** रोजी संयुक्त पाहणी केली. आशियाई विकास बँक अंतर्गत सुरू असलेल्या कामाच्या निविदेमध्ये **Appendix BXX (Environment)** मधील **Clause No. १.२** नुसार आवश्यक ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात गतीरोधक घालणे, सूचना फलक बसविणे इत्यादी कामे करण्यात आली. या रस्त्यावरील दि. **२४/०१/२०२३** रोजी अपघात झाल्याची नोंद **iRAD** संगणक प्रणाली मध्ये आढळत नाही.

सद्य:स्थितीत BC चे काम सर्वतोपरी पूर्ण झाले असून आवश्यक ठिकाणी **Thermoplastic** पध्दतीचे **Rumbling Strip** घालणे व सूचना फलक बसविण्याची कार्यवाही सुरू आहे. निविदेमधील **Schedule K Clause No.२.६** तरतूदीनुसार **Road Safety Audit** करण्यात येणार असून त्या अहवालानुसार अंतिम उचित कार्यवाही करून योग्य जागी आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना करण्यात येणार आहे.

*****************************

एच-२८९ -१३०

लक्षवेधी सूचना क्रमांक :- १७६०

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

श्री. नानाभाऊ पटोले, कुमारी प्रणिती शिंदे, श्री. विजय वडेट्टीवार वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७६० पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी दि. २० फेब्रुवारी, २०२३ पासून आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संप सुरु केला असणे, या संपकरी अंगणवाडी सेविकांच्या काही न्याय मागण्या असणे, त्यात प्रामुख्याने त्यांना शासन सेवेत सामावून घेणे, मानधन वाढ ग्रॅज्युअटी लागू करणे, नवीन मोबाईल देणे, पोषण ट्रकर मराठीत करणे, आहार व इंधनाचे दर वाढविणे, अंगणवाडीचे भाडे वाढविणे, आहार, इंधन अंगणवाडी भाडे, टी.ए.डी.ए. चे थकीत देयके देणे इत्यादी मागण्या असणे, या मागण्यांच्या सोडवुणकीसाठी या अंगणवाडी सेविका सलग २ वर्षे शासनाकडे सातत्याने मागणी करीत असणे, परंतू शासन फक्त आश्वासन देत असणे, आता या अंगणवाडी सेविकांनी बेमुदत संप सुरु केला असतानाही, शासनाने हस्तक्षेप करुन सर्व मान्य तोडगा काढलेला नसणे, या अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे शासनाची एकात्मिक बालविकास योजना प्रभावित होऊन कुपोषित मुलांसाठी पोषण आहार योजना ठप्प होणे, त्यामुळे राज्यातील दुर्गम, ग्रामीण भागात बालकांचे कुपोषण वाढविण्याची भिती निर्माण होणे, तसेच बालमृत्युच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता निर्माण होणे, यामुळे समाजमनात चिंता व्यक्त होत असतानाही, याबाबत कार्यवाही शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सदर विषय गंभीर व महत्वाचा विषयावर करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया"

## मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे निवेदन

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यात १०४ नागरी प्रकल्प व ४४९ ग्रामीण प्रकल्प असे एकूण ५५३ प्रकल्प कार्यान्वित असून त्याअंतर्गत अंगणवाडी सेविका यांची - ९७४७५, मिनी अंगणवाडी सेविका यांची - १३०११ व अंगणवाडी मदतनीस यांची - ९७४७५ अशी एकूण २,०७,९६१ एवढी पदे मंजूर असून सदर पदे मानधनी तत्वावरील आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनाकरिता केंद्र व राज्य हिस्सा याचे निधीचे प्रमाण ६०:४० असे आहे. केंद्र व त्यास समरूप राज्य हिश्या व्यतिरिक्त राज्य शासनाकडून अतिरिक्त राज्य हिश्यामधून देखील मानधन अदा करण्यात येते. अंगणवाडी कर्मचा-यांचे मानधन नियमितपणे अदा करण्यात येत आहे.

अंगणवाडी कर्मचा-यांकडून करण्यात येणा-या विविध मागण्यासंदर्भात अंगणवाडी कर्मचारी संघटनेसमवेत वेळोवेळी बैठक आयोजित करून कार्यवाही करण्यात येते. मिनी अंगणवाडी सेविकेला अंगणवाडी सेविका पदावर पदोन्नती देणे, नागरी प्रकल्पामध्ये अंगणवाडी मदतनिस यांची एकत्रित सेवाज्येष्ठता करुन अंगणवाडी सेविका पदावर पदोन्नती देणे इत्यादी मागण्या मंजूर करण्यात आल्या असून याबाबत शासन निर्णय दिनांक २.२.२०२३ निर्गमित करण्यात आला आहे. तसेच राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मंजूर पदसंख्येच्या मर्यादेत असलेली सर्व रिक्त पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ९.१.२०२३ अन्वये मान्यता

देण्यात आलेली आहे. अंगणवाडीच्या भाडे दरामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वाढ करण्याची बाब विचाराधीन आहे. पोषण ट्रॅकर ॲपमध्ये लाभार्थ्यांचे नाव व जन्मतारीख वगळता इतर सर्व माहिती मराठी भाषेमधून भरण्याची सुविधा केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे.

सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पिय भाषणामध्ये अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा रु.८३२५ वरुन रु.१००००, मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा रु.५९७५ वरुन रु.७२०० व अंगणवाडी मदतनिस यांचे मानधन दरमहा रु. ४४२५ वरुन रु.५५०० पर्यंत वाढविण्याबाबत घोषणा करण्यात आली आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय दिनांक ०३.०४.२०२३ अन्वये अंगणवाडी कर्मचा-यांच्या मानधनवाढीबाबत आदेश निर्गमित करण्यात आला आहे. तसेच अंगणवाडी कर्मचा-यांना सेवाजेष्ठतेनुसार अनुज्ञेय असलेली मानधनवाढ कायम ठेवण्यात आली आहे.

*********************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**ॲड.आशिष जयस्वाल, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१९५६**

## लक्षवेधी सूचना

"राज्यातील दिव्यांग मुलामुलींची शाळा/कर्मशाळा व मतिमंद मुलांचे बालगृहाला अनुदान तत्वावर मान्यतेबाबत बृहत आराखडा व पदमान्यता नसल्याने अनेक वर्षापासून अश्या शाळांना अनुदान न मिळणे, बिगर अनुदान तत्वावर वर्षानुवर्षे या शाळा कार्यरत असल्याने शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी विनावेतन अत्यंत विपरीत परिस्थितीत काम करत असणे, अनुदानाअभावी दिव्यांग शाळेतील खास करुन मतिमंद मुलामुलींचे हाल होणे, काही शाळांना शासनाने विशेष बाब म्हणून मान्यता देणे, मात्र अनेक तालुक्यातील अश्या शाळांना वेतनेत्तर अनुदान व पदमान्यता न मिळाल्याने अश्या शाळांच्या मुलांवर, पालकांवर व कर्मचाऱ्यांच्या मनात शासनाविरोधात निर्माण झालेला प्रचंड असंतोष, या प्रकरणी शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष व ही बाब शासनासाठीही शरमेची असणे, शासनास प्राप्त असलेल्या अनुदान व पदमान्यतेच्या प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्याची व बृहत आराखडा तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्यामध्ये स्वयंसेवी संस्थांमार्फत दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा आणि अनाथ मतिमंद बालगृहे संलग्न वसतीगृहे ही अनुदानित, विनाअनुदानित, कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर चालविले जातात. त्यामधील नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या अनुदानित विशेष शाळा व कर्मशाळांची संख्या ८५२ इतकी आहे, तर विनाअनुदानित/कायमविनाअनुदानित विशेष शाळा/कार्यशाळांची संख्या एकूण ८५६ इतकी आहे. तसेच महिला व बालविकास विभागाकडून हस्तांतरीत झालेली मतिमंद बालगृहांची संख्या १९ असून त्यामधील १४ बालगृहे ही अनुदानित व ५ विनाअनुदानित आहेत. अनुदान तत्वावरील दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व मतिमंद बालगृहे, संलग्न वसतीगृहांना शासनाच्या निकषाप्रमाणे वेतन व वेतनेतर अनुदान देण्यात येते. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांना अनुज्ञप्ती देण्याबाबतचा शासन निर्णय दि.११.०८.२००४ रोजी निर्गमित करण्यात आला असून, सदरहू शासन निर्णयामध्ये दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांना आंतरराष्ट्रीय व केंद्र शासनाकडील अनुदान प्राप्त करता यावेत याकरीता राज्य शासनाचे कोणतेही अनुदान कायमस्वरुपी मागणार नाही, असे हमीपत्र घेऊन अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार अनुज्ञप्ती द्यावी, तसेच आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी त्यांच्या

कार्यालयाकडे नविन अनुज्ञप्तीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर संबंधीत संस्थांकडून उक्तप्रमाणे हमीपत्र घेऊन नियमानुसार अनुज्ञप्ती देण्याबाबतची कार्यवाही करावी, असे नमूद केले आहे. त्यानुसार राज्य शासनाकडून कोणतेही अनुदान कायमस्वरुपी मागणार नाही, असे संस्थेने बंधपत्र सादर केल्यानुसार संबंधित संस्थांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावरील दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा सुरु करण्याकरीता आयुक्तालय स्तरावरुन दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते व सदर नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात येते.

दिव्यांगांच्या विनाअनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा, मतिमंद बालगृहे संलग्न वसतीगृहे यांना अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबतचे धोरण तयार करण्याचे काम शासन स्तरावर सुरु आहे. तसेच दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांचा बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून सुरु आहे. दिव्यांगांसाठीच्या उपक्रमांचा बृहत आराखडा व अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबतचे धोरण निश्चीत झाल्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने धोरणातील निकषांप्रमाणे अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.सुनिल भुसारा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७०० पुढीलप्रमाणे आहे:-

" पालघर जिल्हयातील वाडा नगरपंचायत कार्यालयामध्ये लेखापाल पदावर श्री.अमित शेट्टी हे कार्यरत असणे, सदर अधिकारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नसल्यामुळे त्यांच्या कामातील नेहमीचीच दिरंगाई लक्षात येणे, त्याबाबत विचारणा केली असता, अगदी उर्मटपणे पालघर येथे जिल्हयातील कार्यालयात अथवा मंत्रालयात कामानिमित्त गेलो होतो अशी सबब देऊन कार्यालयात उपस्थित न राहण्याचे बहाणे त्यांचेकडून वांरवार करण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच मागील वर्षभरात वारंवार अशाप्रकारे गैरहजर राहत असल्याचेही निदर्शनास येणे, संबंधित लेखापाल (श्री.शेट्टी) कार्यालयात येणाऱ्या नागरिकांशी मनमानी पध्दतीने असभ्य वर्तवणूक करीत असल्याने नागरिकांकडून त्यांचेबाबत सतत तक्रारी येत असणे, इतकेच नव्हेतर, त्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.अतिरिक्त मुख्य सचिव (नगरविकास विभाग) मंत्रालय तसेच मा.जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे दि.७ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये तक्रार निवेदन देण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, तथापि अद्यापही कारवाई करण्यात न येणे, त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वाडा नगरपंचायत मध्ये कार्यरत असलेले लेखापाल श्री.अमित शेट्टी यांचेविरुध्द माजी नगरसेविका वाडा नगरपंचायत, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे बेजबाबदार व गैरवर्तणूकीबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे तक्रार केली आहे, ही वस्तूस्थिती आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संबंधित लेखापाल यांचा खुलासा मागविण्यात आला असता त्यांनी याबाबत सविस्तर खुलासा सादर केला आहे.

उक्तप्रमाणे लेखापाल श्री.अमित शेट्टी यांनी सादर केलेला खुलासा सकृतदर्शनी समाधानकारक वाटत असल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांचे अहवालात नमूद केले आहे. तथापि, मा.सदस्यांनी याप्रकरणी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेता भविष्यात अशा पध्दतीने कार्यालयीन शिस्तीचा भंग होणार नाही, तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांना सौजन्याची वागणूक देण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात आल्या आहेत.

*******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४३२ पुढीलप्रमाणे आहे :-

" रत्नागिरी जिल्हयातील गुहागर नगरपंचायत हद्दीत १४ वा वित्त आयोग योजनेंतर्गत करावयाच्या रस्ते, पाखाडी, गटार व संरक्षक भिंत अशा कामांच्या दि.२/११/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या ४१ पैकी तब्बल २४ कामांच्या जागा हया नगरपंचायत मालकीच्या नसल्याची गंभीर बाब दि.१/१/२०२० रोजी वा त्यासुमारास समोर येणे, मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनीच सदर माहिती अर्जदार जयदेव मुरलीधर मोरे, रा.गुहागर यांना माहितीच्या अधिकाराखाली दिलेली असणे, त्यामुळे खोटी प्रमाणपत्रे सादर करून कामे मंजूर करून शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याचे निष्पन्न होणे, त्यामुळे मुख्याधिकारी तसेच सदर कामांना मंजुरी देणाऱ्या प्रक्रियेतील संबंधितांवर कारवाईची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेली मागणी, त्यावर सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना शासनाने आदेश देणे, या आदेशानंतर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून त्रिस्तरीय समिती गठीत केलेली असणे, सदर समितीने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे अहवाल सादर केलेला असणे, मात्र २ वर्ष उलटूनही हा अहवाल शासनाला सादर करण्यात आलेला नसणे, त्यामुळे अहवाल गुलदस्त्यात ठेवून नगरपंचायत गुहागर यांनी केलेल्या बेकायदेशीर कामांना पाठिशी घालण्याची भूमिका शासनाची आहे का, असा प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असलेली अत्यंत संतापाची व चिडीची भावना, बेकायदेशीर व नियमबाहय कामे करून कोणतीही कारवाई होत नसल्याने अशा प्रकारे अन्य कामे करण्याचे नगरपंचायतीला मिळालेले बळ, यातून वाढलेला मनमानी कारभार व प्रचंड भ्रष्टाचार, ही गंभीर बाब लक्षात घेवून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर नगरपंचायत क्षेत्रात १४ व्या वित्त आयोगांतर्गत ४१ कामांना सर्वसाधारण सभा ठराव क्र.६ दिनांक १८/०७/२०१५८ व स्थायी समिती दिनांक ०७/०७/२०१८ अन्वये नगरपंचायतीकडून मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेल्या ४१ कामांना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे मान्यतेनंतर ३६ कामांना नगरपंचायतीने कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा/नगरपंचायती व औद्यौगिक नगरी अधिनियम, १९६६ चे कलम २(४२) प्रमाणे सदरील जागा हया ग्रामपंचायत काळापासून सार्वजनिक वहिवाटीच्या असून सदर जागांचा वापर हा सार्वजनिक प्रयोजनार्थ केला जात आहे. सदर कामांबाबत नागरीकांच्या तक्रारी नसून त्यांची मागणी व सार्वजनिक हित विचारात घेऊन सदरची कामे करण्यात आली असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

१४ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीतून कामे मंजूर करण्यासाठी निकष डावलून, खोटे प्रमाणपत्र सादर करुन, तसेच शासनाची दिशाभूल व फसवणूक करणाऱ्या नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी व इतर दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करुन सेवेतून निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तक्रार केली, ही वस्तूस्थिती आहे. यानुषंगाने चौकशी करुन अहवाल सत्वर सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना दिल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर केला असता अहवालाच्या छाननीअंती याप्रकरणी पुनश्चः स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविले आहे. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

*******

रोटा/एच-३२४[७००-६-२०२३].

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.वैभव नाईक, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७४९ पुढीलप्रमाणे आहे:-

" राज्य शासनाने राज्यातील ग्रामीण भागात पथदिवे लावण्याकरिता ईईएसएल या कंपनीकडून पथदिवे खरेदी करणे बंधनकारक करण्यात येणे, यामुळे मालवण नगरपरिषदेच्या, जि.सिंधुदुर्ग यांच्या पुरवठादाराने ईईएसएल कंपनीशी १८ वेट डेकॉरेटिव्ह लाईट व ५०० वॅट एलईडी पुरविणेबाबत करारनामा करण्यात येणे, परंतु मालाचा पुरवठा न केल्यामुळे दि.५.८.२०२२ व १५.११.२०२२ रोजी दोन स्मरणपत्रे पाठवूनही अदयापही पुरवठा न केल्यामुळे नगरपरिषद हददीतील अंदाजे २०० लाईट बंद अवस्थेत असणे, तसेच या कंपनीला दि.२९.१०.२०२१ रोजी ६,६०,७९७ व दि.५.८.२०२२ रोजी ९,३२,४५६/- रुपये एवढी रक्कम अदा करुनही पथदिव्यांचा पुरवठा करण्यात न येणे, परिणामी शहरातील बंद अवस्थेतील पथदिव्यांची दुरूस्ती करतांना मर्यादा येत असल्याने नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

राज्य शासनाने नगरपरिषद हद्दीतील पथदिवे पुरवठा करणे व देखभाल दुरुस्ती करणेसाठी शासन निर्णय दि.२०/०१/२०१८ अन्वये ईईएसएल या कंपनीची नियुक्ती केली असून या कंपनीसोबत मालवण नगरपरिषदेने दि.१४/०२/२०१८ रोजी करारनामा केलेला आहे. त्यानुसार ईईएसएल कंपनीकडून मालवण नगरपरिषद हद्दीतील स्ट्रीट लाईट डेकोरेटीव्ह लाईट व हायमास्ट यांचेसाठी एकूण २५४४ दिवे बसविण्यात आलेले आहे. या दिव्याची देखभाल दुरुस्ती ईईएसएल कंपनीने नियुक्त केलेल्या कंपनीच्या प्रतिनिधीमार्फत करारपत्रानुसार करण्यात येत आहे.

सन २०२२ च्या गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी नगरपरिषदेने सन २०२०-२१ मध्ये वैशिष्टपूर्ण योजनेअंतर्गत एलईडी दिवे वगळून १२ कामे मंजूर केले असून त्यासाठी लागणारी एलईडी दिवे, डेकारेटीव्ह लाईटस व शहरातील विदयुत पथदिवे व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी एलईडी दिवे मागणी करण्यात आली होती. तथापि गणोशोत्सव कालावधीत सदरचे दिवे प्राप्त झाले नाहीत. याबाबत वारंवार पाठपुरावा केल्यानंतर दिपावली उत्सव दरम्यान मागणीपैकी केवळ ३० नग पथदिवे व ११० वॅट ऐवजी कमी क्षमतेचे ७५ वॅट क्षमतेचे हायमास्ट दिवे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. संबंधित संस्थेकडून डेकोरेटीव्ह लाईटसचा पुरवठा करण्यात आलेला नसून त्याच्या उपलब्धतेबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिले नसल्याचे नगरपरिषदेच्या अहवालात नमूद आहे.

ईईएसएल कंपनीचे एकूण देयक मागणी प्राप्त असून यापैकी दि.२९/१०/२०२१ रोजी रक्कम रु.६,६०,७९७/- व दि.०५/०८/२०२२ रोजी रक्कम रु.९,३२,४५६/- असे एकूण रक्कम रुपये १५,९३,२५३/- अदा करण्यात आलेले आहे, ही वस्तूस्थिती आहे.

मालवण नगरपरिषद क्षेत्रात ईईएसएल कंपनीकडून देण्यात येणाऱ्या सेवेमध्ये सातत्य नसल्याने नागरीक, पर्यटक व लोकप्रतिनिधी यांच्याकडून नाराजी व्यक्त केली जाते. तसेच मालवण शहर पर्यटन शहर असल्याने वारंवार नादुरुस्त होणाऱ्या पथदिप व्यवस्थेमुळे व्यापारी, व्यावसायिक यांच्या रोषास सामोरे जावे लागत असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे, ही बाब विचारात घेता याप्रकरणी व्यक्तीश: लक्ष देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना देण्यात आल्या आहेत.

*******

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**सर्वश्री श्री.सुरेश (राजूमामा) भोळे**, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेली **लक्षवेधी** सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात पुणे जिल्ह्यातील साडेसतरानळी हडपसर पुणे येथील सिटी कॉर्पोरेशन लिमिटेड निर्मित अमनोरा पार्क टाऊन या टाऊनशिप एकात्मिक नगर वसाहत मधील सेक्टर आर २६ मध्ये सरकारी जागेत शासनाचे फसवणूक करून दिशाभूल करणारी कागदपत्रे देऊन बहुमजली इमारतीचे बांधकाम केलेले असणे, त्यामधून अंदाजे ६५० सदनिका सुमारे सात हजार रुपये प्रति स्क्वेअर फुट प्रमाणे विक्री केल्या असून त्यामधून अब्जावधी रुपयाचा नफा शासनाची जमीन विकून मिळवलेला असणे ,याविषयी शासनाच्या महसूल व नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे अनेक तक्रारी आलेले असतानाही त्यावर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसणे, त्यासाठी शासनाने संबंधित सदनिकाधारकांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी या टाऊनशिप वर तातडीने कारवाई करण्याची मागणी सामान्य जनतेतून होत असणे ,यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

## मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

पुणे जिल्हयातील मौजे हडपसर व मुंढवा, ता. हवेली, जि. पुणे येथील सिटी कॉर्पोरेशन लिमिटेड निर्मित अमनोरा पार्क एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पास प्रथमत: दि.१३.०८.२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये व त्यानंतर दि.१३.०८.२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये वाढीव क्षेत्राकरिता लोकेशनल क्लिअरन्स देण्यात आलेले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी दि.२०.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पासाठीचे शेवटचे वाढीव प्रकल्प क्षेत्रास उद्देश पत्र (Letter Of Intent ) दिलेले आहे. जिल्हाधिकारी यांचे सदर पत्रातील अट क्र.१३ नुसार, "प्रस्तुत प्रकल्पातील समाविष्ट शासकीय जमीन सर्व्हे नं.१८२/२/६अ, १८७/४, १८७/७, १८७/९, १८७/१५, १८८/१अ व १९५/१अ/१/३ मधील एकूण २ हे. १४.६८ आर. तसेच नाला नं.१ लगत असलेल्या सर्व्हे नं.२४२, १३८ व १३९ लगत ची बिनानंबरच्या शासकीय जमीनीचे क्षेत्र १४१८.४५ चौ.मी. तसेच नाला नं.२ असलेल्या सर्व्हे नं.२४२, १८१, १८२, १७७ च्या लगतची बिनानंबरच्या शासकीय जमिनीचे एकूण क्षेत्र ५३५३.४६ चौ.मी. असे नाला नं.१ व २ लगतचे एकूण क्षेत्र ६७७१.९० चौ.मी. क्षेत्र या विशेष नगर वसाहत प्रकल्पाकरीता भाडेपट्टयाने देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेकरिता विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर करणेत आला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाकडील अंतिम आदेश प्राप्त होई पर्यंत वर नमूद

शेटा/एच. ०२७७(७००-६-२०२३) (क्र.मा.प.)

केलेले उपरोक्त गटावरील जमिनीवर कोणतेही बांधकाम करणेत येवू नये. तसेच शासनाकडील अंतिम आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहून सदरचे उद्देशपत्र देणेत येत आहे." नमूद केलेले आहे.

उपरोक्त अटींमध्ये नमूद केलेले सर्व्हे नंबर हे क्षेत्र शासनाकडील लोकेशन क्लिअरन्सच्या अधिसूचनेमध्ये अंतर्भूत असून, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील उद्देशपत्रामधील (Letter Of Intent) उपरोक्त अटीनुसार शासकीय जमीन निर्गतीबाबत शासनाकडील अंतिम आदेश प्राप्त होईपर्यंत उपरोक्त जमीनवर कोणतेही बांधकाम करणेत येऊ नये, असे बंधन विकासकावर घातलेले आहे.

या उद्देशपत्रानुसार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून वेळोवेळी सुधारित बृहत आराखडे मंजूर करण्यात आलेले असून, शेवटचा बृहत आराखडा प्राधिकरणाकडील दि.०८.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मंजूर केला आहे. मंजूर बृहत आराखड्यामध्ये सेक्टर आर २६ लगतची सर्व्हे नं.१८२/२/६अ ही ३४००.०० चौ.मी. क्षेत्राची जमिन ही शासकीय जमीन म्हणून दर्शविलेली असून त्या जागेवर १२.०० मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित आहे. तथापि, F.S.I. परिगणनेमध्ये सदरचे क्षेत्र वजा करून उर्वरित क्षेत्रावर अनुज्ञेय F.S.I. ची परिगणना करण्यात आलेली आहे. त्यामुळे या शासकीय जमिनीवर बहुमजली बांधकाम केलेले असल्याचे तसेच त्यामधून अंदाजे ६५० सदनिका विक्री केल्याबाबत, दिसून येत नाही.

...........................

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्रीमती मंदा म्हात्रे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात अनेक कंपन्या तसेच हॉटेल असून त्यांचा महापालिकेला भरणा असलेला मालमत्ता कर अनेक वर्षापासून थकीत असणे, महापालिकेमार्फत सदर कंपन्या व हॉटेल व्यावसायिकांना वारंवार जप्तीच्या नोटिसा देणे, नवी मुंबईतील ग्रामस्थांच्या घरांनाही वसुलीबाबत तगादा लावणे, तदनंतर महापालिका अधिकाऱ्यांकडून कंपनी व हॉटेल मालकाला समजावता करण्यासाठी आमंत्रित करण्यात येणे, समजावता झाल्यानंतर कोट्यवधी रुपयांची थकीत रक्कम कमी करण्यात येणे, सदर हॉटेल, बार व कंपन्यांना लावण्यात आलेला मालमत्ता कर हा किती लावण्यात आला? कश्याचा आधारे लावण्यात आला? किती कमी करण्यात आला? याची चौकशी करण्याची आवश्यकता, त्यामुळे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडणे, याआधीही सदर पदावर असलेल्या उप-आयुक्तांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे त्यांची झालेली उचलबांगडी, अजूनही सदरबाबत न्यायालयात खटला सुरू असणे, सद्यस्थितीत नवी मुंबई महापालिकेत महसूल विभागाचे उप-आयुक्त नसतानाही अतिरिक्त कार्यभार पाहणाऱ्या अधिकारीही अशा औद्योगिक कंपन्यांकडून समजावता करीत असल्याच्या वारंवार येत असलेल्या तक्रारी, त्यामुळे पुन्हा महापालिकेतील भ्रष्टाचार उघडकीस येणे, सदर संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची गरज, महापालिकेत सदर जागेवर अधिकारी नसल्याने उप-आयुक्त नियुक्ती करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही तसेच उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना या क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीमधून थेट महानगरपालिकेत दि. ०१.०१.१९९२ रोजी झाली आहे. महापालिकेच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२७ व १२९ नुसार महापालिका क्षेत्रातील सर्वच जमिनी व इमारतींवर मालमत्ता कराची आकारणी दि.०१.०१.१९९४ पासून करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका औद्योगिक क्षेत्रामध्ये असलेल्या कंपन्या व हॉटेल यांना, एमआयडीसीमार्फत वितरीत करण्यात आलेल्या बांधकाम पूर्णत्वाचा दाखल्यानुसार, महानगरपालिकेमार्फत त्यांची करनिर्धारणा वेळोवेळी करण्यात येते. त्यानुसार सदर कंपनी / हॉटेल यांना मालमत्ता कराचे देयक बजाविण्यात येते व त्यापुढे मालमत्ता कराचे देयक प्रत्येक सहा महिन्याच्या कालावधीकरीता बजाविण्यात येते. सदर देयकानुसार मालमत्ता कराचा नियमित भरणा मालमत्ता धारकाकडून केला जातो. ज्या कंपन्या व हॉटेल्स मालमत्ता कराचा नियमित भरणा करीत नाहीत अशा कंपनी व हॉटेल क्षेत्रातील थकीत मालमत्ता कर धारकांवर अधिनियमातील कराधान नियम प्रकरण ८ नियम ४२ ते ४५ अन्वये वसुलीबाबतच्या कार्यवाही करीता ०७ दिवसांची नोटीस, ४८ तासांची नोटीस या नोटीस बजावून वसुलीबाबत कार्यवाही करण्यात येते. या नोटीस बजाविल्यानंतरही थकीत मालमत्ता कराचा भरणा न केल्यास अटकावणीबाबत नोटीस बजावून स्थावर जंगम मालमत्ता जप्त करणे अथवा उक्त मालमत्ता जप्त करणेबाबत तरतुद आहे.

तथापि, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील एमआयडीसी अंतर्गत स्मॉल स्केल एंटरप्रिन्युअर्स असोसिएशन यांच्या मालमत्ता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत येत नसलेबाबत, त्यांनी मा. उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. मा. उच्च न्यायालयाने दि.१०.०७.२०१० आदेशान्वये एमआयडीसी अंतर्गत येणाऱ्या सर्वच मालमत्ता धारकांना मालमत्ता कर देय आहे असा निर्णय देऊन दावा निकाली काढला. या संदर्भात स्मॉल स्केल एंटरप्रिन्युअर्स असोसिएशन यांनी मा. सर्वोच्च न्यायालय येथे Special Leave to Appeal (C) No. २५५२-२५५७/२०१७ अन्वये अपील दाखल केले असून यासंदर्भात दि. ०६.०२.२०१७ रोजीच्या मा. सर्वोच्च न्यायालयाकडील अंतरीम आदेशान्वये स्मॉल स्केल एंटरप्रिन्युअर्स असोसिएशन यांच्या मालमत्तांवरील थकींत रक्कमेवरील शास्तीबाबत जबरदस्ती वसूलीची कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये असे आदेश प्राप्त असल्यामुळे, एमआयडीसी क्षेत्रामध्ये बऱ्याच मालमत्ता कराची थकबाकी आहे. सदरबाबत स्मॉल स्केल एंटरप्रिन्युअर्स असोसिएशनच्या सभासदांना या कार्यालयाव्दारे मालमत्ता कराची मुळ रक्कम भरण्याबाबत वारंवार आवाहन करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये पुर्वीचे गावठाण क्षेत्राचाही समावेश असल्याने गावठाण क्षेत्रामधील ज्या घरांचे नव्याने करनिर्धारणा झाली आहे व ज्यांच्या कराची रक्कम थकीत आहे अशा थकीत मालमत्ता धारकांना, मालमत्ता कराचा भरणा करणे करीता रिक्षाव्दारे घोषणा करून अथवा सूचनापत्र (Cortesy letter) देण्यात येऊन कर भरणेकरीता आवाहन करण्यात येते. मध्यंतरी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव झाल्याने अनेक गरीब व कामगारवर्ग यांच्या कामधंदयावर विपरीत परिणाम झाला असल्याने, मालमत्ता कराच्या थकबाकीत वाढ झाली होती. अशा कर थकीत दारांना दिलासा मिळावा या दृष्टीकोनातुन नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे मालमत्ता कराच्या सर्व थकबाकीदारांकरीता अभय योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवरील शास्तीच्या रक्कमेमध्ये ७५% व ५०% पर्यंत सुट देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ अनेक मालमत्ता धारकांनी घेतला आहे. तथापि, संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रातील सर्व थकबाकीदारांना ज्याप्रमाणे सुचनापत्रे (Cortesy letter) देण्यात आलेली आहेत. तशीच सुचनापत्रे गावठाण भागातील थकबाकीदारांनाही देण्यात आलेली आहेत. याव्दारे कर भरणेकरीता आवाहन करण्यात येत असून कोणत्याही प्रकारचा तगादा लावण्यात आलेला नाही. तसेच कोणतीही कठोर कारवाई अद्यापपर्यंत करण्यात आली नाही.

महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे करनिर्धारण करण्यासाठी दरवर्षी भाडेदरपत्रक तयार करण्यात येते व त्यानुसारच बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र / भोगवटा प्रमाणपत्र नुसार नवीन मालमत्तांचे करनिर्धारण करण्यात येते. यामध्ये कोणत्याही प्रकारे जादा दराने करनिर्धारण करून नंतर कमी करण्यात येत नाही. तथापि, चुकीची करनिर्धारणा झाल्याबाबत काही हरकती प्राप्त झाल्यास सुनावणी घेऊन हरकत योग्य असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४८५ नुसार योग्यती दुरुस्ती करण्यात येत असते. यामध्ये महापालिकेच्या महसुलाची कोणत्याही प्रकारच हानी झालेली नाही.

| वर्ष | प्रत्येक वर्षी दि. १८ मार्च पर्यंतची वसूली |
|---|---|
| २०२०-२१ | ४४७.६७ कोटी |
| २०२१-२२ | ४५१.०१ कोटी |
| २०२२-२३ | ४९१.७६ कोटी |

उपरोक्त आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची आकडेवारी पहाता प्रत्येक वर्षी मालमत्ता कराच्या महसुलात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यापूर्वीचे उप करनिर्धारक व संकलक यांचेवर अशाच प्रकारचे आरोप झाले होते. त्यावेळी त्यांचेवर विभागीय चौकशी लावण्यात आली होती. यासंदर्भात पूर्वीचे उप करनिर्धारक व संकलक यांचेवरील विभागीय चौकशीची कार्यवाही पुर्ण झाली आहे. तथापि, लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी चालू आहे.

सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांबाबत कर कमी करणे, पैशाची मागणी करणे अशा प्रकारचा भ्रष्टाचाराबाबत कोणत्याही तक्रारी महापालिकेकडे प्राप्त नाहीत. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये उप आयुक्त संवर्गाची एकूण ११ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सेवा प्रवेश नियम २०२१ नुसार, पदोन्नती-५०% व प्रतिनियुक्तीने नियुक्ती- ५०% या प्रमाणानुसार पदोन्नतीने नियुक्ती करीता ०६ पदे उपलब्ध होत असून सद्यस्थितीत महानगरपालिकेचे ०३ अधिकारी उप आयुक्त पदावर कार्यरत आहेत. महापालिकेच्या "सहाय्यक आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची "सहाय्यक आयुक्त पदावरील ०३ वर्ष अनुभव या सेवा प्रवेश नियमामधील अटीची पूर्तता होत नसल्याने सदर अधिकारी "उप आयुक्त संवर्गात पदोन्नतीसाठी पात्र होत नाहीत. शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करीता ०५ पदे उपलब्ध असून सद्यस्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये शासनाकडून प्रतीनियुक्तीने नियुक्तीवरील अधिकाऱ्यांची संख्या ०५ आहे. त्यामुळे उप आयुक्त संवर्गात पद रिक्त नाही. यानुसार "उप आयुक्त संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांकडे तीन तीन विभागाचे कार्यभार सोपविण्यात आले आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत उप आयुक्त संवर्गात प्रतिनियुक्तीच्या कोटयामध्ये पद रिक्त नसल्याने आणि पदोन्नतीच्यां कोटयामध्ये पदोन्नतीसाठी निम्नसंवर्गात पात्र अधिकारी नसल्यामुळे "उप आयुक्त मालमत्ता कर या पदावर अधिकारी उपलब्ध नाही. तसेच वरिष्ठ अधिकारी अतिरिक्त आयुक्त, कर विभागामधून प्रतिनियुक्तीने आलेल्या असल्याने व त्यांना कर विभागाचा पुर्वानुभव असल्याने त्याच्याकडे या पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

*********

टपा -०४०७ - ९ अ.

## महाराष्ट्र विधानसभा

<u>नगर विकास विभाग</u>

<u>सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशनामध्ये मान्य झालेली लक्षवेधी सूचना</u>

**श्री. समाधान अवताडे, मा.वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत असलेल्या धन्वंतरी व साळुंखे मॅटर्निटी होम ही खाजगी रुग्णालय जन्म मृत्यूची नोंदी, अपत्यांची हेराफेरी व आपत्य जन्माला आल्यानंतर त्यांच्या कागदोपत्रांमध्ये अपहर करत असल्याची तक्रार प्राप्त होणे, याचे उदाहरण म्हणजे एका नगरपरिषदेच्या निवडून आलेल्या नगरसेवक व राजकिय नेत्याने व त्यांच्या पत्नी ज्या सरकारी नोकरदार आहेत त्यांनी त्यांच्या पोटी जन्माला तिसरे आपत्य लपवण्यासाठी स्वताचे आपत्याला आपल्याच नातेवाईकांना सोपवून नातेवाईकाचे नांव लावलेले असणे, पत्नी तसेच वडील व आडनांव ही नावे बदलण्यासाठी सन २०१५-२०१६ च्या दरम्यान रुग्णालयात भरती होत असताना आधारकार्ड ओळखपत्र म्हणून घेत नसल्याचा फायदा घेवुन संबंधितांनी सिंधुनगर महानगरपालिका चिंचवड जन्ममृत्यु नोंदणी व पिंपरी चिंचवड शहरा मधील खाजगी दवाखान्यात खोट्या नावाने उपचार घेवुन यशवंतराव चव्हाण मेमोरीयल हॉस्पिटल, पिंपरी चिंचवड महापालिका दवाखाना व सिंधुनगर महापालिकेचा दवाखाना निवडल्याची सत्य घटना घडलेली असणे, आपल्या पत्नीस तिसरे आपत्य झाल्याने सदर राजकीय नेत्याने आपले राजकीय कारकीर्द वाचविण्यासाठी व निवडणुका लढविण्यासाठी पूर्वनियोजन करून कागदोपत्री हेरफेर केलेला असणे, सदर नेत्याने धन्वंतरी व साळुंके मॅटर्निटी होम, पिंपरी चिंचवड या खाजगी हॉस्पिटलमध्ये नाव नोंदवतांना स्वताच्या पत्नी एवजी नातेवाईकाचे व त्याच्या पत्नीचे नांवाने उपचार घेवुन महापालिकेला त्या खोट्या नावाने नोंद करुन राजकिय पदाचा लाभ घेत असणे,तसेच तिस-या आपत्य झाले असताना त्यांच्या पत्नीने देखील सदरची बाब लपवून ठेवणे, तसेच तक्रारदरांनी सदरचे आपत्य त्यांच्या नातेवाईकाला विकत तर नसतील ना अशी शंका निर्माण होणे, या उपस्थित शंकेला सदर नेत्याने उत्तर देताना हे आपत्य माझेच असून हिमंत असेल तर सिद्ध करून दाखवा असे खाजगीत बोलत असणे, यामुळे तक्रारदारांनी सदर तिसऱ्या अपत्याची सदर राजकीय नेत्याची व त्यांच्या पत्नीची डि.एन.ऐ टेस्ट करण्याची व तसेच खोटी नांवे लावण्यासाठी मदत करणारे रुग्णालयाची संपुर्ण चौकशी कारवाई करण्याची मागणी होत असणे, सदर राजकीय नेत्याने व त्यांच्या पत्नीने खाजगी रुग्णालयांच्या मदतीने शासनाची केलेली दिशाभूल व फसवणूक यावर शासनाने करावयाची कारवाई."

### <u>मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत घडणा-या जन्म-मृत्यु घटनांच्या नोंदी मनपाच्या १० उपनिबंधक कार्यालयामध्ये घेण्यात येतात. सदर उपनिबंधक कार्यक्षेत्रातील शासकीय व खाजगी रूग्णालयात जन्म झाल्यानंतर तेथील रूग्णालयात बाळाचे आई-वडीलांकडून अथवा त्यांचे सोबत असलेल्या नातेवाईकडून बालकांची जन्माची नोंद करण्यासाठी जन्म अहवाल (सुचना पत्रक) भरून घेतला जातो. सदर जन्म अहवालावर माहिती भरणा-याची स्वाक्षरी व रूग्णालयाचा सही शिक्का असतो. सदरचे जन्म अहवाल संबंधित खाजगी/शासकीय रूग्णालयाकडून महानगरपालिकेच्या त्या-त्या कार्यक्षेत्रातील उपनिबंधक कार्यालयात सॉफ्टकॉपी व हार्डकॉपी स्वरूपात जन्माची नोंद करण्यासाठी पाठविले जातात.

कागदपत्रांमध्ये हेराफेरी करून जन्म दाखल्याची नोंद केल्याबाबत कोणतीही तक्रार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे प्राप्त नाही. तसेच सदरचे लक्षवेधी सुचनेमध्ये अपत्याच्या नावाचा तसेच बाळाच्या आई-वडीलांच्या नावाचा, आडनावाचा उल्लेख नसलेने खुलासा करता येणार नाही.

*****

रोटा/एच३८८[७५०-६-२०२३].

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

# महाराष्ट्र विधानसभा
# सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.संजय केळकर, श्री.बंटी भांगडिया, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री.योगेश सागर, श्री.अतुल भातखळकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:

"पुणे महामार्गावरील खेड, राजगुरू नगर जवळच्या शिरोली परिसरात दि.१३.२.२०२३ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या अपघातात अज्ञात वाहनाने रस्ता ओलांडणा-या महिलांच्या ग्रुपला धक्का दिल्याने सदर अपघातात ५ महिलांचा मृत्यू झाला असून १७ महिला गंभीररित्या जखमी झाल्याचे उघडकीस येणे, जखमी महिलांना रुग्णालयात दाखल करून पोलिसांनी अज्ञात वाहनधारकाच्या विरोधात गुन्हा दाखल करणे, अद्यापपर्यंत वाहनचालकाचा शोध न लागणे, गंभीररित्या जखमी झालेल्या महिलांना तसेच मृत झालेल्या महिलांच्या कुटुंबियांना शासनाकडून तातडीने मदत देण्याची होत असलेली मागणी, शासनाने याची दखल घेऊन त्यांना मदत देण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पुणे नाशिक महामार्गावरील शिरोली गावचे हद्दीत खरपुडी फाटा येथे दि.१३.०२.२०२३ रोजी नाशिक हायवे रोडवर रस्ता क्रॉस करणाऱ्या स्वयंपाकी महिलांना अज्ञात वाहन चालकाने भरधाव वेगात धडक दिली. त्या अपघातात एकूण ५ महिला मृत्यू पावल्या असून ३ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. सदर अपघाताबाबत खेड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १३४/२०२३ भा.द.वि. कलम ३०४ (अ), ३०४ (२), २७९, ३३७, ३३८ मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४ (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून तपासाअंती अपघातातील वाहन चालक कानिफनाथ बबन कड यास अटक करण्यात आली असून आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत येरवडा कारागृह, पुणे येथे आहे.

मोटार अपघात ग्रस्तांना शासकीय आर्थिक मदत देण्याबाबत तरतूद नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून त्यांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

*****

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**श्री.रविशेठ पाटील, कुमारी आदिती तटकरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"रायगड जिल्हयातील ता.पेण मध्ये खारेपाट विभागातील महसूली गावातल्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी मे. / SEZ Ltd. या कंपनीस देवून शेतकऱ्यांचे योग्य पॅकेजव्दारे पुनर्वसन करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने सन २००४ चे अधिसुचनेव्दारे घेतला. मात्र, त्यानंतर मुंबई SEZ Ltd. या कंपनीकडून दिनांक ८ जून, २००७ मध्ये महाराष्ट्र शासनाबरोबर केलेल्या करारामध्ये संमती निवाडयाचा व सोबत जाहीर केलेले पुनर्वसन पॅकेजचा उल्लेख नसणे, जे जाहीर करण्यात आले त्याची आजमितीपर्यंत पुर्तता झालेली नसणे, महाराष्ट्र प्रकल्पबाधित पुनर्वसन कायदा १९९९ चे कलम १२ (१) व (१२) अन्वये खरेदी केलेल्या जमीनीचे बदल्यात पुनर्वसन पॅकेज न दिल्यास भुसंपादन झालेल्या जमीनीची संमती निवाड्याने व खरेदीखताने हस्तांतरीत झालेल्या जमीनींचा व्यवहार कलम १२ (३) नुसार स्पष्टपणे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास येणे, कंपनीने संपादीत झालेल्या जमीनी संमती निवाडयाने परस्पर शासनास हाताशी धरून नावे केलेल्या असणे, खोट्या व बनावट ताबेपावत्या करण्यात आल्याचे उघडकीस येणे, सबंधित शेतजमीनी आजही शेतकऱ्यांच्या ताब्यात असून त्यावर ते शेती करीत असणे, म्हणजेच महाराष्ट्र टेनन्सी ॲग्रीकल्चर ॲक्ट १९४८ चे कलम ६३/१ अ नुसार खालील तरतूद असणे, Provided further that, Such purchase of land shall be subject to the condition that it shall be put to industrial use within the specified total period years from the date of purchase. Failing which are person from whom the land was purchased shall have the right to repurchase such land at the price for which it was originally sold by him. याचप्रमाणे कंपनीने शासनासोबत दिनांक ८ जुलै, २००७ रोजी केलेल्या करारातील कलम ७ चा देखील भंग होणे, अधिसुचनेनुसार व कलम १२ नुसार जमिनीचे हस्तांतरण करणेपुर्वी शासनाची म्हणजेच आयुक्तांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक असतांना भुसंपादन व खरेदीखत प्रक्रियेत संमती निवाड्याची अगर खरेदीखताची परवानगी देण्यात आलेली नसणे, SEZ प्रकल्प १५ वर्षात पूर्ण झालेला नसणे, शासन निर्णयानुसार संमती निवाडे करतांना मुळ शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष जिल्हाधिकारी यांचे समोर सह्या करणे अशी अट असतांना गैरमार्गाने संमती निवाडे हे अंधारात ठेवून कुलमुखत्यारपत्राच्या आधारे करण्यात येणे, या प्रकल्पाकरीता केंद्र शासनानेही मुदतवाढ न देणे, अशा अनेक प्रश्नांअंती शासनाने माहे जानेवारी, २०१४ मध्ये संपादित जमीनींचा वापर SEZ प्रकल्पाकरीता होत आहे वा कसे याबाबत तहसिलदार, पेण यांचेकडून पंचनाम्यासहीत मागविलेल्या अहवालात कंपनीने शेतकऱ्यांच्या जमीनी घेवून ठरल्यानुसार पॅकेज वा पुनर्वसन न करता कसलेही प्रोजेक्टचे काम सुरू वा कार्यावित केलेले नाही तसेच शेतकऱ्यांनी जमिनी परत मिळाव्यात म्हणून अर्ज केलेले असल्याचे स्पष्टपणे नमुद असणे, म्हणून चुकीच्या पध्दतीने झालेली भुसंपादनाची प्रक्रिया व संमती निवाडे (ॲवार्ड) रद्द झाल्याचे शासनाने जाहीर करून प्रकल्प रद्द करण्याची घोषणा करावी व ७/१२ सदरील कंपनीची नोंद रद्द करून कब्जेदार सदरील शेतकऱ्यांची नावे पुर्ववत करावी, या मागणीसाठी शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती पसरलेले नाराजीचे वातावरण व त्यांचे भविष्याची दखल घेवून दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

# श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मे.मुंबई इंटिग्रेटेड सेझ लि. या कंपनीच्या मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) प्रकल्पास केंद्र शासनाने दि. ८.०८.२००३ अन्वये तत्वता: मान्यता दिली. त्यानुसार विकास आयुक्त, उद्योग यांचे आदेश दि.१६.०६.२००५ नुसार सदर प्रकल्पाकरीता रायगड जिल्ह्यातील पनवेल, पेण व उरण तालुक्यामध्ये जमिनी खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ मधील तरतुदीनुसार परवानगी देण्यात आली आहे.

पेण तालुक्यातील विशेषत: खारेपाट विभागातील २४ महसूल गावापैकी १५ गावातील जमीन संपादनाबाबत दि. जून ते सप्टेंबर २००६ रोजी भुसंपादन अधिनियम १८९४, कलम ४ ची अधिसूचना तसेच दिनांक जून ते जुलै २००७ रोजी कलम ६ ची अधिसूचना जाहिर करण्यात आली. भूसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम ११ (१) अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून चौकशी व निवाडा जाहीर करणेची तरतूद आहे. भूमी संपादन अधिनियम १८९४ मधील कलम ३९ अन्वये कंपनीसाठी भूसंपादन करतांना समुचित शासनाची पूर्वपरवानगीने करारनाम्याचे निष्पादन करणे आवश्यक आहे. कलम ४० कक अन्वये जी कंपनी सार्वजनिक प्रयोजनासाठी असलेल्या कोणताही उदयोग किंवा काम करीत आहे किंवा करण्याचे दृष्टीने पावले टाकीत आहे त्या कंपनीस भूसंपादन करता येईल अशी तरतूद आहे. कलम ४१ अन्वये भूसंपादन करतांना समुचित शासना बरोबर करार करणे आवश्यक आहे. त्यानुसार अनोंदणीकृत करारनामा दिनांक ८.०६.२००७ रोजी करण्यात आलेला आहे. तसेच सदर करारामध्ये संमती निवाडयाचा व पुनर्वसन पॅकेजबाबत उल्लेख आहे.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९, कलम ११ खालील अधिसूचना विभागीय आयुक्त, कोकण यांनी दि.१०.०५.२००६ रोजी प्रसिद्ध केली. आणि महामुंबई SEZ प्रकल्पास उक्त अधिनियमाच्या कलम १ पोट कलम (४), खंड (अ) च्या तरतुदी लागू करुन सदर प्रकल्पामुळे बाधित गावे व लाभकारी गावे विनिर्दिष्ट केली आहेत. पुनर्वसन अधिनियम १९९९, कलम १२ (१) व (२) अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी आदेश दिनांक ३०.११.२००६ अन्वये सदरहू कंपनीस भूसंपादन अधिनियम १८९४, कलम ४ अन्वये अधिसूचित केलेले क्षेत्राकरीता साठेकरार करण्यासाठी १ ते १० अटी शर्तीवर परवानगी दिली आहे.

पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम १२ (३) अन्वये कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन केलेल्या जमिनीचे हस्तांतरण निरर्थक व अप्रवर्ती असेल अशी तरतूद आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग यांचेकडील आदेश दि.३०.११.२००६ अन्वये १ ते १० अटी शर्ती लागू केल्या आहेत. सदर आदेशातील अट क्रमांक ५ अन्वये कंपनी ज्या जमिनीचे साठे करार करेल अशा शेतक-यास प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन अधिनियम १९९९ प्रमाणे शासन जाहीर करेल ते पुर्नसनाचे पॅकेज देणे बंधनकारक असेल असे नमूद केले आहे.

परंतु सदर प्रकरणी शासनाने विवक्षित असे कोणतेही पॅकेज निश्चित केलेले नाही. कंपनीने स्वत:चे असे पॅकेज जाहीर केलेले आहे.

भूसंपादन अधिनियम अन्वये संमती निवाड्यानुसार पेण तालुक्यातील एकूण क्षेत्र १०२४-०३-६४ हे.आर संपादन केले आहे. संमती निवाड्यावर शेतक-यांच्या सह्या घेतलेल्या आहेत. ताबा कंपनीस दिलेला आहे. खोट्या व बनावट ताबेपावत्या तयार करणे अशी बाब नाही.

तहसिलदार, पेण यांचे अहवालानुसार सदर संपादीत जमिनीवर भाताची लागवड करीत आहेत. तसेच काही जमिनी पडीक आहेत.

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ मधील कलम ६३ (एक) (अ) नुसार पेण तालुक्यात एकूण क्षेत्र ८-५९-५० हे.आर. इतक्या जमिनी खरेदी केल्या असून क्षेत्र ५-९१-४० हे.आर क्षेत्रास १५ वर्षे पुर्ण झाले आहेत. उर्वरित २-६८-१० हे.आर. इतक्या क्षेत्रास अदयाप १५ वर्ष पूर्ण झालेले नाहीत.

महाराष्ट्र कुळवहिवाट १९४८ चे कलम ६३ (एक)(अ) व सुधारणा दिनांक ०१ जानेवारी २०१६ अन्वये औदयोगिक वापराकरीता घेतलेले क्षेत्र संबंधिताने १५ वर्षात न वापरल्यास ज्या किंमतीला विकली त्यांच किंमतीस मुळ शेतक-याला फेर खरेदी करण्याचा हक्क आहे.

संपादनानंतर केलेल्या दिनांक ८.०७.२००७ रोजी केलेल्या करारातील अ.क्र. ७ अन्वये कंपनीने कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास जमीन शासन जमा करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र पुनर्वसन अधिनियम १९९९, कलम १२ (२) अन्वये आयुक्त यांचे परवानगीने जमिनीची खरेदी करता येईल अशी तरतूद आहे. त्यास अनुसरुन विभागीय आयुक्तांनी त्यांचे अधिकार कलम १२(१) (२) अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित केले असून त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी दि.३०.११.२००६ अन्वये साठेकरार करण्यास परवानगी दिली आहे.

जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेशानुसार वाटाघाटीने एकूण ६३-४६-९० हे.आर इतके क्षेत्र खरेदी केलेले आहे. सदर खरेदीस १५ वर्षे पूर्ण झालेली नाहीत. भूसंपादन अधिनियमान्वये संमती निवाड्यानुसार पेण तालुक्यातील एकूण १०२४-०३-६४ हे.आर. इतके क्षेत्र संपादन केले आहे. संमती निवाडे विशेष भूसंपादन अधिकारी काळ प्रकल्प क्र.२ माणगांव यांनी भुसंपादन अधिनियम १८९४, कलम ११(२) अन्वये संमतीने निवाडे जाहीर केलेले आहेत.

करार नोंदणीकत असून त्यावर विक्रेते म्हणून शेतकऱ्यांच्या सह्या आहेत व खरेदीदार म्हणून मुंबई एस.ई.झेड. कंपनीकरीता अधिकृत प्रतिनिधींची स्वाक्षरी आहे. त्यामुळे गैरमार्गाने संमती निवाडे कुलमुखत्यारपत्राच्या आधारे करण्यांत येणे अशी बाब नाही.

महामुंबई विशेष आर्थीक क्षेत्र या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने दि.९.०८.२००६ च्या पत्रान्वये दि.७.०८.२००८ पर्यंत दुसरी मुदतवाढ दिलेली आहे. तद्नंतर मुदतवाढ दिल्याचे दिसून येत नाही. महामुंबई विशेष आर्थीक क्षेत्र या प्रकल्पासाठी संपादित जमिनीचा वापर SEZ प्रकल्पाकरीता कंपनीने अद्याप सुरु केलेला नाही.

संबंधित जमिनीच्या ताबेकब्जा तसेच पीक पाहणी अनुषंगाने स्थळपहाणी केली असता काही मिळकतीवर भातशेती केली असल्याचे व काही मिळकती पडीक असल्याचे निदर्शनास आले आहे.

*********************************

## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**मा.श्रीम. यामिनी यशवंत जाधव, वि.स.स.यांनी म.वि.स.नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"माझगाव मुंबई येथील सिटी सर्व्हे क्र.३०९ भूखंड अहनद बिल्डिंग टेनन्स कॉ.आ.है.सो. या सोसायटीला हस्तांतरीत करण्यासंदर्भात सन २०२० पासून आजपर्यत जिल्हाधिकारी, मुंबई यांनी ७/८ सुनावणी घेणे, एवढया सुनावणी घेऊनही जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे सुध्दा न पाठवणे, सदर प्रकरणी निर्णय घेण्यामध्ये जिल्हाधिकारी, मुंबई यांनी जाणीव पूर्वक केलेले दुर्लक्ष व अक्षम्य. विलंब, भुखंड हस्तांतरीत करण्याबाबत गृहनिर्माण संस्थेची दीर्घकाळापासून मागणी प्रलंबीत असणे, याप्रकरणी शासनाने त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यत्त्का, शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका व प्रतिक्रीया."

---

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मुंबई शहरातील माझगाव महसुल विभागातील भूकर क्रमांक ३०९ क्षेत्र १३७७.९३ चौ.मी. ही मिळकत शासनाने दिनांक ०१/०१/१८७३ पासून ९९ वर्षाच्या मुदतीकरिता भाडेपट्टयाने दिलेली होती. सदर मिळकतीच्या मिळकत पत्रिकेवर मूळ भूकर क्रमांक ३०२ प्रमाणे भाडेपट्टाधारक लेसी म्हणून सेठ रनछोडदास वल्लभदास व त्यांची पत्नी दाईबाई यांचे नाव दाखल आहे तर उपभाडेपट्टाधारक (सब-लेसी) सदरी शेरो नरसवानजी रुपा यांचे नाव दाखल आहे.

सदर मिळकतीचा भाडेपट्टा करार दिनांक ३०/१२/१९७२ रोजी संपुष्टात आला आहे. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १२/१२/२०१२ अन्वये भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीचे भाडेपट्टा संपुष्टात आल्यानंतर भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यासंबंधीचे धोरण सुनिश्चित केले आहे. सदर धोरणानुसार भाडेपट्टाधारकांचे वारस म्हणून श्री. क्रिष्णराजजी नरोतमदास अशर यांनी दिनांक २२/०१/२०१९ अन्वये भाडेपट्टा नुतनीकरणाची मागणी केली आहे. तसेच, उक्त मिळकतीचे सब-लेसी यांचेकडून विकसनाचे हक्क नोंदणीकृत दस्ताव्दारे घेतलेले विकासक मे.व्हॅलेन्सीया ग्रुप ऑफ कंपनीज यांनी दिनांक ०४/०६/२०१३ अन्वये नुतनीकरणासाठी विनंती केली आहे. त्याचबरोबर मिळकतीवर वास्तव्य करणारे रहिवाशी अहमद बिल्डींग टेनन्टस को.ऑप.हौ.सो. यांनी सदरची मिळकत सोसायटीचे नावे मिळणेबाबत दिनांक २९/०९/२०२१ अन्वये विनंती केली आहे.

त्यानुषंगाने माझगाव महसुल विभागातील भूकर क्र.३०२, ३०४ व ३०९ या मिळकतीमधील भाडेपट्टा नुतनीकरण, हस्तांतरण व पुर्नविकासाच्या अनुषंगाने दि.३०.०९.२०२० व दि.१६.१०.२०२० रोजीचे अर्ज तसेच श्री. अशर यांचा नुतनीकरण करण्याकरिताचा विनंती अर्ज व जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये प्राप्त झालेल्या इतर अर्जाबाबत, सदरहू भुखंडावर झालेले अतिक्रमण, शर्तभंग तसेच सदरहू मिळकतीवरील कब्जेदार, भाडेपट्टादार व मा. उच्च न्यायालयाचे आदेश तपासून सर्व संबंधितांची सुनावणी घेण्याबाबत शासनाच्या दि.०६.०७.२०२१ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना कळविले होते. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे स्तरावर दि.२२.०४.२०२२, दि.२३.०५.२०२२, दि.२४.०६.२०२२, दि.१५/०७/२०२२, दि.११.०८.२०२२, दि.२७.०९.२०२२ व दि.१५.१२.२०२२ रोजी संबंधितांची सुनावणी घेण्यात आली. विकासक व्हॅलेन्सीया ग्रुप ऑफ कंपनीज यांनी सदर मिळकतीचे विकासक हक्क नोंदणीकृत दस्ताद्वारे सब लेसी श्री. बटलर यांचेकडून घेतलेले असून मिळकतीचे नुतनीकरण त्यांचे नावे मिळणेस विनंती केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे प्रस्तुत शासकीय जमिनीचे भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत सर्व हितसंबंधाना वेळोवेळी सुनावणीची संधी देण्यात आली असून, सदर प्रकरणी जाणिवपुर्वक कोणताही विलंब झालेला नाही. सदर इमारतीचा पुर्नविकास व नुतनीकरणाबाबत शासनस्तरावरुन आदेश होणेकामी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दिनांक २०.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावरुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन
## लक्षवेधी सुचना क्र. १२३०

श्री. निलेश लंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १२३० पुढील प्रमाणे :-

"माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी सप्टेंबर, २०२२ मध्ये मुंबई-चर्चगेट येथील मातोश्री हॉस्टेल व विविध ठिकाणी असलेल्या विद्यार्थ्यांच्या हॉस्टेलला दिलेल्या अचानक भेटीत या हॉस्टेलमध्ये विद्यार्थ्यां ऐवजी मंत्रालयातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घुसखोरी केल्याची बाब उघडकीस आल्यानंतर पोलीसांच्या मदतीने घुसखोरांवर कारवाई करण्याचे दिलेले आदेश, वृत्तपत्रातील बातमीच्या आधारे राज्य मानवी हक्क आयोगाने सुमोटो याचिका दाखल करुन उच्च शिक्षण विभागाला स्पष्टीकरणाची दिलेली नोटीस, प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांनी घुसखोरी केलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना लेखी नोटीस बजावून हॉस्टेल रिकामे करताना वापलेल्या दिवसांचे भाडे भरण्याबाबत दिलेले आदेश, या हॉस्टेलमध्ये विद्यार्थ्यां ऐवजी मंत्रालयातील अधिकारी व राजकीय कार्यकर्ते यांना राहण्यास परवानगी देणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांविरुध्द तातडीने कारवाई करण्याची नितांत आवश्यकता असताना, त्यांच्याविरुध्द कारवाई होत नसणे, शासकीय जागेचा घुसखोरी करुन वापर केल्याबद्दल कायद्यात असणाऱ्या सर्व कलमांचा वापर करुन घुसखोरी करणाऱ्याविरुध्द कडक कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता असताना, सप्टेंबर २०२२ पासून या घुसखोरांविरुध्द कारवाई करावे असे प्रधान सचिवांचे आदेश असतानाही कारवाई झाली नसल्याने ग्रामीण भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या हजारो विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या मनात उच्च शिक्षण विभागाच्या ढिसाळ व हेतूत: विलंब करणाऱ्या प्रवृत्तीबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## श्री. चंद्रकांत पाटील, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे निवेदन

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी सप्टेंबर, २०२२ मध्ये चर्चगेट मुंबई येथील मातोश्री वसतिगृहास भेट दिली असता काही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्र संपले तरीही असे विद्यार्थी वसतिगृहात वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आले होते. सन २०२१-२२ चे नविन शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतर वेळोवेळी नोटीस देऊनही विद्यार्थी खोली रिक्त करीत नसल्याने विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण मुंबई यांनी याबाबत त्यांचे पत्र दि. ११.११.२०२२ नुसार पोलीसांना कळविले होते. त्यानुसार पोलीसांच्या मदतीने अनधिकृतपणे राहणाऱ्या विद्यार्थ्यांकडून सदर कालावधीसाठी दंडनिय शुल्क आकारुन खोल्या रिक्त करण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णय दि. २३.०५.२०१६ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अधिकारी - कर्मचाऱ्यांसाठी सात दिवसांच्या कालावधीकरीता दहा खोल्या राखीव

ठेवण्यात आलेल्या असून अधिकारी-कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या खोल्यांमध्ये प्रवेश देण्यात येत नाही. मा. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मंबई येथे सुमो-टू दाखल करण्यात आलेली याचिका क्र. ४१८३/१३/१६/२०२२ या याचिकेमध्ये मा. आयोगाने, "वर्तमानपत्रात छापून आलेल्या प्रकरणी विभागाने योग्य तो निर्णय घेऊन प्रकरण निकाली काढले असून याप्रकरणी अधिक हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही." अशा प्रकारचे आदेश दि. १२.०४.२०२३ रोजी पारित करुन मा. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने सदर याचिका निकाली काढली आहे.

--------------------

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र. २४९२**

**श्री. नितिन अर्जुन (ए.टी.) पवार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली स्वीकृत लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"जि. ठाणे, शहापूर तालुक्यातील आसनगांव ग्रामपंचायतीमार्फत घनकचरा व्यवस्थापन खत निर्मिती प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या मशिन खरेदीमध्ये २१ लाखांहून अधिक निधीचा अपहार करून आर्थिक घोटाळा झाल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदरहू मशिन खरेदीसाठी आसनगांव ग्रामपंचायतीला कोणतीही जागा उपलब्ध नसताना आणि प्रत्यक्षात मशिन खरेदी न करता २४ लाख ३० हजार रुपयांचा अर्थकेअर इक्विपमेंट प्रा. लि. या कंपनीला धनादेश क्र.०२२७८७ अन्वये अदा करण्यात येणे, सदरहू मशिन खरेदीची मुळ किंमत ३५ लाख ५ हजार ५४९ एवढी असताना ५६ लाख ८२ हजार ७३७ एवढे मुल्यांकन करण्यात येऊन यामध्ये संबंधितांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचा प्रकार उघड होणे, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी लेखी तक्रार करून व त्यानंतर दोन महिने पाठपुरावा केल्यानंतर या प्रकरणाची चौकशी होऊन याबाबतचा अहवाल सादर करण्यात येणे, परंतु अद्याप चौकशी अहवालानुसार दोषी व भ्रष्ट अधिका-यांविरुध्द शासनातर्फे कोणतीच कारवाई न करता प्रकरण दडपून टाकण्यात येणे, यामुळे सदर प्रकरणात शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात झालेला अपव्यय व आर्थिक नुकसान, सदर प्रकरणाची शासनाने तातडीने चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील ग्रामस्थ जनतेत निर्माण झालेला तीव्र अंसतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

---

## मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

ग्रामपंचायत आसनगाव, ता शहापूर, जि. ठाणे यांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) मध्ये नागरी सुविधा योजना आराखड्या अंतर्गत ग्रामसभा ठराव क्रमांक ३/४ दिनांक २८/०६/२०१९ रोजी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर करण्याबाबत ठराव केला होता.

सदरचा प्रस्ताव दिनाक २८/०८/२०१९ रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये शहापूर तालुक्यातील ग्रामपंचायत आसनगाव येथे कच-यापासून खत निर्मिती या प्रकल्पासाठी रक्कम रू. ६९,१६,७९३/- इतक्या रकमेस दिनाक १८/०१/२०२० रोजी प्रशासकीय मान्यता देणेत आली. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्यामार्फत ५० टक्के रक्कम (पहिला हप्ता ) रक्कम रू. २४,३४,०५४/- व गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर यांचे दिनांक- २५/११/२०२१ रोजीच्या मागणीपत्रानुसार

(क्रु.मा.प.

उर्वरीत ५० टक्के (दुसरा व अंतीम हप्ता ) रक्कम रुपये २५,६५,२४७/- ग्रामपंचायतीच्या खात्यावर ZPFMS प्रणालीद्वारे वर्ग करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीने ई-निविदा दिनांक २०/०३/२०२१ रोजी प्रसिध्द करून त्यानंतर सदरचे काम मे. अर्थकेअर इक्विपमेंट प्रा.लि. (श्री. रमेश शंकर वाघ प्लाट नं- NCX-८/२/२ नियर महिंद्रा भोसरी एम.आय.डी.सी. पुणे यांची रक्कम रू.५६,९९,४३७/- इतक्या रकमेची निविदा मंजुर करण्यात आली, त्यास कार्यारंभ आदेश दिनांक जा. क्र. आसनगाव / वशि- २०२१ / दिनांक १६/०४/२०२१ रोजी देण्यात येऊन दिनांक १८/११/२०२१ रोजी मशिनचा पुरवठा संबंधित ठेकेदाराकडून करण्यात आलेला आहे. उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, शहापूर व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, ठाणे यानी केलेल्या मुल्यांकनानुसार सदर मशिनचे रक्कम रु. ५१,१४,४६३/- असून ग्रामपंचायत, आसनगाव यांचेकडून दिनांक १६/०७/२०२१ रोजी रु. ५१,१४,४६३/- रकमेपैकी रु. २४,३४,०००/- एवढी रक्कम धनादेश क्रमांक ०२२७८६ नुसार संबंधित ठेकेदारास अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रु.२६,८०,४६३/- अद्यापही ग्रामपंचायतीच्या खात्यावर उपलब्ध आहे.

तथापि, नियोजित केलेल्या जागेत कचऱ्यापासून खतनिर्मितीसाठी स्थानिक रहिवाशी व शेतकरी यांनी दुर्गंधीचा त्रास होऊ शकतो म्हणून विरोध केल्याने ग्रामपंचायतीने सदर विषय दिनांक २७/१२/२०२१ रोजी ग्रामसभेत घेऊन सदर प्रकल्प औद्योगीक क्षेत्रातील खुला भुखंड कपालेश्वर लघु उद्योग येथील सर्वे क्रमांक- १३,१४,१६४/१, १६४ ब/२ क्षेत्र ५१.६५ गुंठे जागेवर कच-यापासुन खतनिर्मिती करण्याचा प्रकल्प राबविण्याचा ठराव पारीत करण्यात आला. त्यानुसार सदर जागा ग्रामपंचायतीकडे हस्तांतर करण्यासाठी तहसिलदार शहापूर, जिल्हा-ठाणे यांच्याकडे ग्रामपंचायतीने मागणी करून सदरची खुली जागा दिनांक २१/१०/२०२२ रोजी ग्रामपंचायत आसनगाव च्या नावे करण्यात आली. त्यानुसार सदर प्रकल्प तयार करण्यासाठी मंजुर करण्यात आलेल्या जागेत काम सुरू करण्यात आलेले असून सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर सदर खत निर्मिती प्रकल्पाची मशिन बसविण्यात येणार आहे. प्रस्तुत प्रकरणी कोणताही अपहार झाल्याचे सकृत दर्शनी दिसून येत नाही.

तसेच सदर प्रकरणी श्री. दिपक भास्कर चंदे, आसनगाव, ता शहापूर यांनी दिनांक ०९/०२/२०२२ रोजी पंचायत समिती कार्यालयास तक्रार केली होती. परंतु सदर तक्रारीबाबत त्यांची खातरजमा झाल्यानंतर तक्रारदार श्री. दिपक भास्कर चंदे यांनी दिनांक २२/०३/२०२२ रोजी त्यांची तक्रार मागे घेऊन निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्र.२२६

## सन २०२३ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना**

**श्री. छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, विधानसभा सदस्य**

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय व कनिष्ट महाविद्यालय, मुंबई (इयत्ता ८ वी ते १२ वी) ही सरकारी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असणे, या शाळेचा बहुतांश भाग इतर कार्यालयीन कामांकरिता वापरला जात असणे, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्व. श्री. प्रमोद नवलकर यांच्यासह अनेक आदरणीय व्यक्तींनी या शाळेत शिक्षण घेतलेले असणे, अशा शाळेला व वास्तुला अखेरची घटका मोजत असल्याची अवकळा आलेली असणे, आज जागतिक स्तरावर तांत्रिक शिक्षणाला मोठी मागणी असताना या शाळेची अधोगती व्हावी यासारखे दुर्दैव नसणे, केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत व्यवसाय शिक्षणाला महत्व देण्यात आले असणे, त्या अनुषंगाने इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत शालेय शिक्षणासोबत व्यवसाय शिक्षण देण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आलेले असणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणापूर्वीच महाराष्ट्र राज्याने व्यवसाय शिक्षणाला महत्त्व दिले असणे, शालेय शिक्षणाला तांत्रिक व्यावसायिक विषयांची जोड देऊन ६वी ते ८वी प्रास्ताविक व्यवसाय अभ्यासक्रम (Introductory Vocational Course) व ९ वी ते १२ अभ्यासक्रमांतर्गत एकात्मिक व्यावसायिक शिक्षणाची (Integrated Vocational Course) जोड देवून हे नवीन अभ्यासक्रम एल्फिन्स्टन तांत्रिक शाळेमध्ये सुरु करण्याची मागणी असणे, या शाळेच्या इमारतीमधील इतर शासकीय कार्यालये अन्य ठिकाणी स्थलांतरित करावे आणि आगामी शैक्षणिक वर्षापासून एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय व कनिष्ट महाविद्यालय, मुंबई येथे पूर्णवेळ विविध नवीन तांत्रिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करुन या शाळेला गतवैभव मिळवून देण्याची लोकप्रतिनिधी यांनी दि. ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री , मा. उपमुख्यमंत्री आणि मंत्री कौशल्य विकास यांचेकडे मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री, कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे निवेदन

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मुंबईची स्थापना सन १८७२ मध्ये झाली असुन तांत्रिक शिक्षणाची सुरुवात १९४१ पासून झाली आहे. या इमारतीस ऐतिहासिक वारसा आहे. सदर इमारत व तिचा परिसर हेरिटेज साईट (Ancient monuments and Archaeological Sites and Remains Act १९५८) अंतर्गत येतो.

सुरुवातीपासून विद्यालयात इ. ८ वी ते १० वी स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व इ. ११ वी व १२ वी स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम नियमित विषयांबरोबर शिकविले जात होते. पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये जुलै २०१५ मध्ये बदल झाल्यामुळे पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम इ. ९ वी - १० वी स्तरावर शिकविले जात आहेत. तसेच विद्यार्थी प्रवेश संख्येत सातत्याने घट होत असल्याने इ. ९ वी १० वी स्तरावरील स्वयंपूर्ण शाळेचे रुपांतर सन २०१९ पासून तांत्रिक केंद्रात करण्यात आले आहे.मात्र इ.११ वी १२ वी स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम हे स्वयंपूर्ण कनिष्ठ महाविद्यालय म्हणून राबविण्यात येत आहेत.

सद्य:स्थितीत विद्यालयात इ. ९ वी १० वी स्तरावर पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम राबविले जातात. त्यात केवळ तांत्रिक विषय शिकण्यासाठी अन्य सहभागी शाळांमधील विद्यार्थी प्रवेश घेतात. कालानुरुप तंत्रशिक्षणामध्ये झालेले बदल, गरज व मागणी तसेच, परिसरातील मराठी शाळांची तसेच

एस.एस.सी.पॅटर्न राबविणाऱ्या शाळांची कमी झालेली संख्या हे पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता प्रवेश कमी होण्याची प्रमुख कारणे आहेत.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची कार्यालये कार्यरत आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मांडवी, संस्थेकरीताचे इमारत काम पूर्णत्वाकडे असून संस्था लवकरच नवीन जागेत स्थलांतरीत होणार आहे. कौशल्य विकास विद्यापीठाला औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल येथे नवीन इमारतीसाठी जागा शासनाकडून देण्यात आली आहे. पूर्व व व्दिलक्षी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे.

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयाच्या जागेमध्ये इतर विभागांची ८ कार्यालये कार्यरत आहेत. कुलाबा मतदार संघ निवडणूक कार्यालय, शासकीय अध्यापक महाविद्यालय, राज्य मराठी भाषा विकास संस्था यांचे कार्यालय स्थलांतर करणेबद्दल संबंधित विभागाला जागा रिक्त करण्याबाबत विनंती केली असून पाठपुरावा करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने काळानुरुप औद्योगिक आस्थापनेला गरज असणाऱ्या तांत्रिक कौशल्याबाबतचे कौशल्य विद्यापीठाअंतर्गत नवीन तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम इतर विभागांनी जागा रिक्त केल्यास या इमारतीत सुरु करण्यात येणार आहेत. तसेच विभागाअंतर्गत ८ वी ते पदवीपर्यंतचे तांत्रिक अभ्यासक्रम सुरु करण्यात येवून त्याव्दारे मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

संस्थेतील उपलब्ध संसाधनांचा महत्तम वापर होण्याच्या दृष्टीने कौशल्य केंद्राची स्थापना करण्यात आली असून पहिल्या टप्प्यात फीटर-फॅब्रिकेशन व इलेक्ट्रीशियन डोमेस्टिक सोल्युशन हे अल्पमुदतीचे तांत्रिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार असून त्यांना कौशल्याधारित उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे त्याचा लाभ विद्यार्थी, युवक यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी होणार आहे.

एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल माजी विद्यार्थी उत्कर्ष समिती, ठाणे यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्याबाबत कृती आराखडा अंतिम झाल्यानंतर इयत्ता ६ वी पासून विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

संस्थेच्या विकासासाठी व इमारतीच्या परिसराचे जतन व संवर्धन तसेच सुशोभिकरण करण्यासाठी एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयाच्या मुख्य इमारतीची हेरिटेज इमारती अंतर्गत (टप्पा-१) जिर्णोद्धार व इमारत सुशोभिकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

************************************